१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, सोमवार ८ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९५, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 95 Marathi - Daily - Mumbai, 8 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in

CJP चे आंदोलन तर झाले, पण आता पुढे काय?

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

# घरगुती एलपीजी सिलिंडर २९ रुपयांनी महागला! सर्वसामान्यांना आणखी झटका

**महागाईच्या झळा सहन करणाऱ्या सर्वसामान्यांना पुन्हा मोठा फटका बसला आहे. सरकारी तेल कंपन्यांनी घरगुती एलपीजी १४.२ किलोच्या गॅस सिलिंडरच्या किमतीत २९ रुपयांची वाढ केली आहे. ही नवीन दरवाढ मध्यरात्री १२ वाजल्यापासून लागू झाली आहे.**



■ नवी दिल्ली

**आंतरराष्ट्रीय** बाजारातील वाढत्या इंधन दरांमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या दरवाढीनंतर देशातील प्रमुख शहरांमधील सुधारित किंमत पुढीलप्रमाणे आहेत. मुंबईत गॅस सिलिंडरचे दर ९१२.५० रुपयांवरून वाढून ९४१.५० रुपये झाले आहेत. दिल्लीत सिलिंडरची किंमत ९१३ रुपयांवरून ९४२ रुपये झाली आहे. कोलकाता शहरात ग्राहकांना आता एका सिलिंडरसाठी ९६८ रुपये मोजावे लागतील. तीन महिन्यांत दुसऱ्यांदा एलपीजीच्या किमती वाढवण्यात आल्या आहेत. यापूर्वी ७ मार्च रोजी एलपीजी सिलिंडरचे दर ६० रुपयांनी वाढवण्यात आले होते.

गेल्या तीन महिन्यांतील ही घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरातील दुसरी वाढ आहे. यापूर्वी ७ मार्च रोजी सिलिंडरच्या किमतीत तब्बल ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. आजच्या २९ रुपयांच्या दरवाढीनंतर अवघ्या तीन महिन्यांत घरगुती एलपीजी सिलिंडर ८९ रुपयांनी महागला आहे. त्यामुळे आधीच महागलेल्या पेट्रोल-डिझेलच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांच्या खिशावरील भार आणखी वाढणार आहे.

वाढत्या इंधन दरांबाबत विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. काँग्रेस पक्षाने एक्स वर पोस्ट करत केंद्र सरकारवर निशाणा साधला

» पान ७ वर

## शेजारी देशांच्या तुलनेत भारतात गॅसचे दर कमी

**केंद्राचा दावा**

घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत २९ रुपयांची वाढ झाल्यानंतर विरोधकांकडून टीका होत असताना, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने भारतातील एलपीजीचे दर शेजारील देशांच्या तुलनेत कमी असल्याचा दावा केला आहे. मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, नव्या दरवाढीनंतर दिल्लीमध्ये १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ९४२ रुपये झाली आहे. पण भारताच्या शेजारील देशांमध्ये याच क्षमतेच्या सिलिंडरसाठी ग्राहकांना अधिक किंमत मोजावी लागत आहे. पाकिस्तानमध्ये एलपीजी सिलिंडरची किंमत सुमारे १,०४६ रुपये असून, नेपाळमध्ये ती १,२०७ रुपये आहे. बांगलादेशमध्ये ग्राहकांना १,२२५ रुपये, तर श्रीलंकेत १,२४१ रुपये मोजावे लागत आहेत.

विकसित देशांमध्ये एलपीजीचे दर यापेक्षाही अधिक आहेत. अमेरिकेत १४.२ किलो समतुल्य घरगुती गॅस सिलिंडरची किंमत सुमारे १,७५५ रुपये असून, कॅनडामध्ये ती २,४११ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधन दर, आयात खर्च आणि चलन विनिमय दरातील चढ-उतार यांचा परिणाम एलपीजीच्या किमतींवर होत असला, तरी भारतातील घरगुती ग्राहकांना शेजारील देशांच्या तुलनेत स्वयंपाकाचा गॅस कमी दरात उपलब्ध होत असल्याचा दावा केंद्र सरकारने केला आहे.

## थोडक्यात...

### दोन्ही राष्ट्रवादी गटांचा मुंबईत एकाच दिवशी वर्धापन दिन

**मुंबई -** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचा वर्धापन दिन यंदा १० जून रोजी मुंबईत साजरा होणार आहे. शरदचंद्र पवार गटाचा वर्धापन दिन सोहळा सकाळी १० वाजता वाय. बी. चव्हाण सेंटर येथे होणार आहे. तर अजित पवार गटाचा कार्यक्रम दुपारी ३ ते ५ या वेळेत षण्मुखानंद हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे. गेल्या वर्षी अजित पवार राष्ट्रवादीचा मेळावा बालेवाडीत, तर शरद पवार गटाचा मेळावा मुंबईत पार पडला होता. अजित पवार यांच्या निधनानंतरचा हा पहिलाच वर्धापन दिन सोहळा असून, तो सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. त्यामुळे त्यांच्या अध्यक्षीय भाषणाकडे संपूर्ण पक्षाचे लक्ष लागले आहे. पक्षांतर्गत संघर्ष, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांचे पक्षातील स्थान, निवडणूक आयोगात सादर करण्यात आलेली राष्ट्रीय कार्यकारिणी आणि त्यावरून निर्माण झालेला गोंधळ या मुद्यांवर सुनेत्रा पवार काय भूमिका मांडणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे.




### कूनोमध्ये मादी चित्त्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**भोपाळ -** कूनो राष्ट्रीय उद्यानातील चित्ता प्रकल्पात भारतात जन्मलेल्या २७ महिन्यांच्या मादी चित्ता केजीपी-११ चा उपचारादरम्यान मृत्यू झाला, अशी अधिकृत माहिती देण्यात आली. या घटनेनंतर कूनो राष्ट्रीय उद्यानातील चित्त्यांची संख्या घटून ४९ झाली आहे. १ जून रोजी मॉनिटरिंग टीमला रेडिओ कॉलर सिग्नलद्वारे तिचे लोकेशन पहाडगडच्या जंगलात आढळले.



# मान्सूनपूर्व पावसाचा धुमाकूळ

## १ लाख एकर शेती उद्ध्वस्त

**राज्यात आज मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने जोरदार धुमाकूळ घातला आहे. पुणे, सातारा, जळगाव आणि कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे फळबागा, भाजीपाला आणि इतर शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. दुसरीकडे झाडे उन्मळून पडणे, वीजपुरवठा खंडित होणे आणि रस्त्यावर पाणी साचणे अशा घटनांमुळे जनजीवनही विस्कळीत झाले. राज्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे २४ जिल्ह्यांतील १ लाखाहून अधिक एकर क्षेत्र बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.**

■ मुंबई

**सातारा,** पुणे, जळगाव आणि परभणी जिल्ह्यांना या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका बसला. सातारा जिल्ह्यात अचानक हवामानात बदल होऊन मुसळधार पावसाला सुरुवात झाली. वाई तालुक्यातील भुईंज आणि जोशी विहीर परिसरात पावसाचा जोर इतका होता की, काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. अनेक ठिकाणी झाडे आणि फांद्या कोसळल्या. जावळी आणि महाबळेश्वर तालुक्यात नुकत्याच लागवड करण्यात आलेल्या स्ट्रॉबेरी आणि टोमॅटो पिकांना मोठा फटका बसल्याची माहिती आहे. पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील रायगाव फाटा परिसरात सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने एक कार अडकून पडली होती. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत जीप आणि पिकअपच्या सहाय्याने तिला सुरक्षित बाहेर काढले. भोर तालुक्यात दिवळे गावात घरावरचे पत्रे उडाले. त्यामुळे साठवलेले कांदे, धान्य भिजले. बारामती तालुक्यात वादळी पावसामुळे केळीच्या बागांचे मोठे नुकसान झाले. नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामती परिसराला भेट दिली. त्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देत शेतकऱ्यांना शासनाकडून मदत दिली जाणार असल्याचे आश्वासन दिले. जळगाव जिल्ह्यातील नशिराबाद येथे मुंबई-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्याचे पत्रे आणि

» पान ७ वर

# कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात ६-७ हजार लोक उपस्थित! दीपकेची कबुली

■ छत्रपती संभाजीनगर

**'कॉकरोच** जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके आज पहाटे छत्रपती संभाजीनगरात आपल्या घरी दाखल झाले. दिल्लीतील जंतरमंतर येथे 'नीट' प्रकरणाविरोधात आंदोलन केल्यानंतर ते समृद्धी महामार्गाने वाळूज येथील आपल्या घरी परतले. यावेळी माध्यमांशी बोलताना दीपकेने म्हटले की, या आंदोलनात ६ ते ७ हजार लोक सहभागी झाले होते. त्याचे हे वाक्य त्याचे पहिले आंदोलन अपयशी ठरल्याची एकप्रकारे कबुली होती. जंतरमंतरवर झालेल्या त्याच्या आंदोलनाला तुफान गर्दी लोटल्याचे फोटो व्हायरल झाले होते. मात्र हे फोटो एआय निर्मित वाटत होते. त्यामुळे आंदोलनाला किती



प्रतिसाद मिळाला याचा संभ्रम होता. मात्र आंदोलनाला ६ ते ७ हजार लोक आले असे दीपके याने स्वतः म्हटल्याने संभ्रम संपला. आता दीपके हे आंदोलन देशव्यापी करणार असून, त्यासाठी आवश्यक तयारी करील, अशी आशा आहे.

दीपके म्हणाला की, जंतरमंतर येथे झालेले आंदोलन यशस्वी झाले असून, किमान ६ ते ७ हजार लोक सहभागी झाले होते. धर्मेंद्र प्रधान यांच्या विरोधात हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार

» पान ७ वर

# किंमत जास्त असल्याने मोदींनी भेट दिलेला हिरा सरकारला परत केला

■ वॉशिंग्टन

**बायडन पत्नी जिल यांचा खुलासा**

**अमेरिकेचे** माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्या पत्नी जिल बायडेन यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२३ मधील अमेरिकेच्या दौऱ्यावेळी भेट दिलेल्या ७.५ कॅरेटचा कृत्रिम हिऱ्याविषयी एक खुलासा केला आहे. त्यांनी सांगितले की, हा हिरा त्यांना स्वतःकडे ठेवण्याची इच्छा होती. मात्र, अमेरिकन अधिकाऱ्यांनी त्या हिऱ्याचे मूल्य घोषित किमतीपेक्षा खूप जास्त ठरवल्यानंतर त्यांनी तो हिरा अखेर सरकारकडे परत केला.

'व्ह्यू फ्रॉम द ईस्ट विंग : अ मेमॉयर' या आत्मचरित्रात जिल बायडेन यांनी व्हाईट हाऊसमधील अनुभव आणि परदेशी नेत्यांकडून मिळालेल्या भेटवस्तूंचा उल्लेख केला आहे. जून २०२३ मध्ये मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान त्यांना हा हिरा भेट म्हणून दिला होता. जिल बायडेन यांनी लिहिले आहे की, हा ७.५ कॅरेटचा प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेला हिरा भारताच्या कृत्रिम

» पान ७ वर

# राज्यसभेसाठी भुजबळांचा पत्ता कट राष्ट्रवादीकडून राजेंद्र जैन यांना उमेदवारी

■ मुंबई

**राज्यसभेच्या** जागेसाठी अजित पवार राष्ट्रवादीकडून माजी आमदार राजेंद्र जैन यांना काहीशी अनपेक्षित उमेदवारी जाहीर करण्यात आली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मुंबईतील देवगिरी बंगल्यावर झालेल्या राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. राजेंद्र जैन हे प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय समजले जातात.

सुनेत्रा पवार यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे राज्यसभेची ही जागा रिक्त आहे. उद्या या जागेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. या जागेसाठी मंत्री छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा होती. त्यासाठी भुजबळांनी आपले पुत्र समीर भुजबळ यांना राज्यात मंत्रिपद देण्याची अटदेखील ठेवली होती. या जागेबाबत आज रात्री देवगिरी बंगल्यामध्ये सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ, राजेंद्र जैन आणि आदी नेत्यांमध्ये बैठक झाली. या बैठकीत दोन तास दीर्घ चर्चा झाल्यानंतर राजेंद्र जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. त्यानंतर राजेंद्र जैन यांनी सांगितले की, मी सर्वांचे आभार मानतो. पक्षासाठी मी निष्ठेने काम केले आहे आणि यापुढेही निष्ठेने काम करणार आहे. दरम्यान, राजेंद्र जैन हे गोंदिया जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते आहेत.

# वरळी डोममधील कॉन्सर्टमध्ये तरुणाचा मृत्यू! तरुणी अत्यवस्थ

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ मुंबई

**गोरेगावच्या** नेस्को सेंटरमध्ये लाईव्ह संगीत कार्यक्रमात (कॉन्सर्ट) मध्ये अमली पदार्थ सेवनामुळे एका तरुणाचा आणि एका तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच आता वरळीतील एनएससीआय डोम येथे झालेल्या लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टमध्येही एक गंभीर घटना घडली. या कार्यक्रमादरम्यान एका तरुणाचा मृत्यू झाला असून, एका तरुणीला अत्यवस्थ अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी ताडदेव पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे.

वृषभ महेंद्र गांगुर्डे (२८)



असे मृत तरुणाचे नाव असून, तो आपल्या मित्रांसोबत कॉन्सर्टचा आनंद घेण्यासाठी आला होता. कार्यक्रमादरम्यान मोठ्या प्रमाणात गर्दी होती. त्याचवेळी वृषभ याला अचानक अस्वस्थ वाटू लागले. काही क्षणातच तो खाली कोसळला. उपस्थितांनी आणि आयोजकांनी तत्काळ त्याला ब्रीच कँडी रुग्णालयात हलवले. मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्याला

» पान ७ वर

# एमपीएससी विद्यार्थ्यांना खासगी नोकरीची भुलवण

■ मुंबई

**एमपीएससी** परीक्षेत अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचूनही गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या किंवा निवड न झालेल्या उमेदवारांसाठी राज्य सरकारने 'निपुण सेतू' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. याअंतर्गत गुणवंत उमेदवारांना आता थेट खासगी क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सरकारी नोकऱ्या उपलब्ध नसल्या तरी एमपीएससी परीक्षा घेत जाण्याच्या प्रकारातून निर्माण होणारा संताप कमी करण्यासाठी ही योजना आणली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला. एमपीएससी परीक्षांमध्ये मोठ्या संख्येने उमेदवार पात्र ठरत असले तरी उपलब्ध पदसंख्या मर्यादित असल्यामुळे अंतिम निवडीसाठी काही उमेदवारांचीच शिफारस केली जाते. त्यामुळे अनेक गुणवंत व सक्षम उमेदवारांकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता, स्पर्धात्मक परीक्षांमधून विकसित झालेली विश्लेषणक्षमता, नेतृत्वगुण असूनही अपेक्षित रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. याद्दष्टीने राज्यातील खासगी क्षेत्रातील संभाव्य नियोक्त्यांना आणि उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभागामार्फत विकसित केलेल्या एक खिडकी 'मैत्री २.०' पोर्टल अंतर्गत 'निपुण सेतू' हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

# पीओपी गणेश मूर्तीवर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया कुठे करणार?

**स्थायी समितीत समस्यांची विचारणा**

**प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीच्या अवशेषांचे पर्यावरणपूरक शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करण्याचा प्रकल्प महापालिकेच्यावतीने प्रायोगिक तत्वावर हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे पीओपींच्या गणेश मूर्तीवर बंदी असताना पर्यावरणपूरक गणेशमूर्तीबाबत प्रशासनाची भूमिका काय, असा सवाल स्थायी समिती सदस्या प्रीती सातम यांनी समितीच्या बैठकीत केला.**

■ मुंबई

**गणेशोत्सव** तोंडावर आलेला असताना पीओपीच्या गणेश मुर्तीबाबत कोणताही गोंधळ मूर्तीकार आणि उत्सव मंडळांमध्ये होवू



नये यासाठी पालिका प्रशासनाने भूमिका स्पष्ट करण्याची मागणी सदस्यांनी केली. त्यावेळी प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे की, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसर्जित पीओपी मूर्तीच्या अवशेषांचे पर्यावरणपूरक वैज्ञानिक पद्धतीने विघटन, पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर उत्पादन तातडीने करणे पर्यावरणदृष्ट्या आवश्यक आहे. तसेच पीओपी मूर्ती बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पीओपीचा पुर्नवापर आणि पुर्नवापर करण्याच्या बाबी सुचवण्यासाठी राज्य सरकार तज्ज्ञ वैज्ञानिक समिती नियुक्त करेल. वैज्ञानिक पीओपीपासून बनवलेल्या मूर्ती पर्यावरणपूरक पद्धतीने जलद विरघळवण्याच्या पद्धतींचाही तज्ज्ञ समिती अभ्यास करेल. वैज्ञानिक समिती मार्फत मार्गदर्शक तत्वे प्राप्त झाली नसल्यामुळे मूर्ती अवशेष साहित्यापैकी सुमारे १० टन वजनी वैज्ञानिक विसर्जित पीओपी मूर्तीच्या व अवशेषांचे पर्यावरणपूरक वैज्ञानिक पद्धतीने विघटन, पुर्नप्रक्रिया पुर्नवापर उत्पादन प्रकल्प प्रायोगिक तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे.

# अंबानींना मागे टाकून अदानी पुन्हा आशियात सर्वात श्रीमंत

■ मुंबई

**अदानी** समूहाच्या शेअर्समध्ये झालेल्या जोरदार वाढीमुळे उद्योगपती गौतम अदानी पुन्हा एकदा आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बनले. फोर्ब्सच्या रिअल-टाईम अब्जाधीश यादीत अदानी यांची संपत्ती ८९.२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली असून, त्यांनी मुकेश अंबानी आणि मासायोशी सन यांना मागे टाकले आहे.

अदानी समूहाच्या विविध कंपन्यांच्या शेअर्समध्ये यंदा २३ ते ५६ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. अदानी ग्रीन एनर्जी, अदानी एनर्जी, अदानी एंटरप्रायझेस, अदानी पोर्ट्स आणि अदानी पॉवरच्या शेअर्समध्ये झालेल्या तेजीचा थेट फायदा गौतम अदानी यांच्या संपत्तीला झाला. गेल्या महिन्यात अमेरिकेतील न्याय विभागाकडून अदानी समूहाला मोठा दिलासा मिळाल्यानंतर गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला. त्यानंतर समूहाच्या शेअरमध्ये खरेदीचा जोर वाढला आणि अदानी यांच्या संपत्तीत अब्जावधी डॉलरची भर पडली.

# बेस्टच्या १२ संघटना एकवटल्या १८ जूनपासून संपाचा इशारा



■ मुंबई

**बेस्ट** उपक्रमातील कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तोडगा न निघाल्यास १८ जूनपासून बेमुदत संप छेडण्याचा इशारा बेस्टच्या १२ कामगार संघटनांनी दिला आहे. यासाठी सर्व संघटनांनी एकत्र येत संयुक्त कृती समिती स्थापन केली असून, ८ जून रोजी आजी-माजी कामगारांचा मेळावा आयोजित केला आहे.

बेस्ट उपक्रमाच्या परिवहन आणि विद्युत विभागाची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत असून, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणीही मोठ्या प्रमाणात रखडली आहेत. न्यायालयाच्या आदेशानंतरही अनेक कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्काचे पैसे मिळाले नसल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे. याच पार्श्वभूमीवर विविध संघटनांनी एकत्र येत आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला. कृती समितीच्या बैठकीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी तातडीने अदा करणे, नव्याने निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना एका महिन्याच्या आत सर्व देणी मिळावीत तसेच बेस्टचा अर्थसंकल्प मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, महापालिका आयुक्त, महापौर, बेस्टचे महाव्यवस्थापक आणि अध्यक्ष यांना देण्यात येणार आहे. कामगारांच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी प्रशासनाला १८ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# अवैध धंद्यांचे पोषिंदे शोधा

**पुण्यातल्या** विषारी दारू प्रकरणात तब्बल २२ जणांचे बळी गेले. या प्रकरणाबाबत सरकारने यासंदर्भात २१ कर्मचाऱ्यांना निलंबितही केले. गेल्या आठ दिवसांत राज्यात ठिकठिकाणी अवैध दारूचे अड्डे उद्ध्वस्त करण्याचा सपाटा सुरू झाला. जवळपास शंभरावर ठिकाणी तयार होणारी अवैध दारू पोलिसांकडून नष्ट केली गेली. पुण्यातले दारूकांड घडले नसते तर राज्यातली ही सगळी अवैध दारूविक्री अशीच मोकाटपणे सुरू राहिली असती. साधारणपणे हा दरवेळचा अनुभव आहे. अवैध दारूकांडाची अशी काही प्रकरणे घडली की सरकारला जाग येते. आणि त्या त्या ठिकाणची पोलीस स्टेशन्स, उत्पादन शुल्क विभाग या सगळ्या यंत्रणा कामाला लागतात. आणि अवैध दारू अड्डे उद्ध्वस्त होत असतात. मात्र पुढच्या तीन ते सहा महिन्यामध्ये त्याच ठिकाणी पुन्हा दारूविक्रीचे नेटवर्क सुरू होते. एका अवैध दारूविक्री केंद्रातून किमान तीन ते चार लीटर दारू गाळली जाते. या अवैध विक्री दारूची महाराष्ट्रातील उलाढाल जवळपास दहा हजार कोटीपर्यंत असावी असा प्राथमिक अंदाज आहे. कारण पुण्यातल्या दारूकांडानंतर पोलीस यंत्रणांनी वेगवेगळ्या ठिकाणी जी काही कारवाई केली त्यामध्ये दहा कोटी रुपयांपर्यंतचा मुद्देमाल जप्त केला गेला. केवळ एका आठवड्यात सव्वातीन हजार गुन्हे नोंदवले गेले आणि २७०० आरोपींना अटकही केली गेली. हातभट्टीवर तयार होणारी ७५ हजार लीटर गावठी दारू जप्त केली गेली. यातला धक्कादायक भाग म्हणजे आतापर्यंत जी काही कारवाई झाली त्यात सर्वाधिक अवैध दारू ही पुणे जिल्ह्यात तयार होत असल्याचे समोर आले आहे. पुण्याच्या लौकिकाला काळीमा फासणारीच ही घटना ठरते. ज्याअर्थी पुण्यात इतक्या प्रचंड प्रमाणात अवैध दारूचा धंदा चालतो याचा अर्थ त्याला तितकेच तगडे संरक्षणही प्राप्त होते. महाराष्ट्रातल्या अवैध दारू विक्रीचे प्रमाण लक्षात घेतले तर या धंद्याला संरक्षण देणारा मुख्य अड्डा कोणता आहे, याचाच शोध घेतला पाहिजे.

### पुण्यात परिसरात सर्वाधिक अवैध दारू

यातला आणखी एक भाग म्हणजे पोलीस यंत्रणा जाणूनबुजून या सगळ्या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत असतात. राज्याचा उत्पादन शुल्क विभागसुद्धा या अवैध दारूविक्रीकडे दुर्लक्ष करतो आणि या धंद्यामध्ये चालणारी हप्तेबाजी प्रचंड मोठी असल्याने अगदी सहजपणे अवैध दारूविक्रीला स्थानिक पातळीवर मिळणारे संरक्षण आणि कारवाई झाल्यानंतरही अटक झालेल्यांना सहीसलामत बाहेर काढण्यासाठी खेळले जाणारे राजकारण आणि अर्थकारण तितकेच गंभीर ठरते. गेल्या सहा दशकांमध्ये महाराष्ट्रात विषारी दारूचे ५८४ म्हणजेच जवळपास सहाशे बळी गेलेले आहेत. यातला महत्त्वाचा भाग म्हणजे कोणत्याही दारूचे व्यसन हे अनेक व्याधी किंवा आजारांना आमंत्रण देणारे ठरते. त्यात गावठी दारूमुळे अधिक गंभीर स्वरूपाच्या शारीरिक व्याधी निर्माण होतात. ज्याला आपण स्लो पॉयझनिंग म्हणतो म्हणजेच अशा दारूच्या सेवनातून हळूहळू शरीरात भिनत जाणारे विष वेगवेगळ्या आजारांच्या माध्यमातून हजारो लोकांचा बळी घेतात हेदेखील दुर्लक्षित करता येणार नाही. संपूर्ण भारतात एका प्राथमिक अंदाजाप्रमाणे तब्बल ७५ हजार कोटींची अवैध दारूविक्री होते. या सगळ्या प्रकाराचे गंभीर परिणाम माहीत असूनही कोणत्याही राज्याने ठोस कारवाई केलेली नाही. शेजारच्या गुजरात राज्यात आणि बिहारमध्ये दारूबंदी आहे. तरीदेखील चोरट्या मार्गाने दारू विक्री होत राहते. परंतु तिथे मध्य प्रदेश, महाराष्ट्र या राज्यातून दारू पोहोचवली जाते. गेल्या एप्रिल महिन्यात गुजरातच्या भावनगर येथे एका छुप्या कारखान्यावर छापा टाकला गेला होता. त्यात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू जप्त झाली होती. दारुबंदी हा विषय तर दूरच राहिला. कारण सरकारला त्यातून मिळणाऱ्या महसुलाची सर्वाधिक चिंता असते. छत्तीसगढसारख्या राज्यात तर अगदी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सरकारी दारूविक्रीचे परवाने लिलाव पद्धतीने दिले जातात. दुर्दैवाचा भाग असा आहे की, सरकारच्या अधिकृत दारू विक्रीबरोबरच समांतर असे अवैध दारूविक्रीचेही धंदे तितक्याच तेजीमध्ये चालतात. महाराष्ट्रात त्याचे गेल्या दहा वर्षांमध्ये प्रमाण वाढलेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे स्थानिक पातळीवर त्याकडे दुर्लक्ष होते आणि अवैध दारूविक्रेत्यांना अनेक ठिकाणी राजकीय संरक्षणसुद्धा मिळत असते.

### इतर पदार्थांमध्येही भेसळ

एकीकडे अवैध दारूविक्रीचे बळी गेल्यानंतर ठिकठिकाणी छापेमारी झाली. त्याचवेळी राज्याच्या अन्न औषध प्रशासन विभागानेही अनेक प्रकारच्या खाद्यपदार्थातून औषध उत्पादनातून होणाऱ्या भेसळीविरोधात मोहीम उघडली. आतापर्यंत तीन मोठ्या औषध कंपन्यांमधल्या औषध भेसळींविरोधात कारवाई झालेली आहे तर दुग्धजन्य पदार्थात म्हणजेच मावा, खवा यामध्येदेखील होणारी भेसळ या विभागाने शोधून काढली. काही विशिष्ट काळ या शोधमोहिमा घेतल्या जातात. याचा अर्थ संबंधित यंत्रणांकडून नियमितपणाने या भेसळीविरोधात कारवाई केली जात नाही किंवा आपण भेसळ केली तर पकडले जाऊ असाही त्यांना धाक राहिलेला नसतो. नियमितपणाने दुधापासून ते औषधांपर्यंत होणाऱ्या भेसळीविरोधात अधिक जागरूक राहण्याची आवश्यकता आहे. कारण भेसळ करणारे असे धाडस करू शकतात. त्यांची संबंधित यंत्रणांबरोबर असलेली हातमिळवणी लोकांच्या जीवाशी खेळ करणारे ठरत असते. एकूणच सर्वच अवैध धंद्यांना संरक्षण देणारे इतरही मोठे अड्डे असतात. ते नेस्तनाबूत झाले पाहिजेत. खात्रीशीरपणे असे संरक्षण मिळत राहिल्याने कायद्याचा कोणताही परिणाम होत नाही. उलट कायदा धाब्यावर कसा बसवायचा याचे तंत्रही सरकारी यंत्रणांच्यामार्फत छुप्या पद्धतीने राबवले जाते. आणि अवैध धंद्यांना एक प्रकारे वैध असे संरक्षणही मिळत जाते. अन्यथा पुण्यासारख्या सांस्कृतिक महत्त्व असलेल्या जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक अवैध दारूविक्री होऊच शकली नसती.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

निवडलेला रस्ताच जर इमानदारीचा व सुंदर असेल तर थकून जाण्याचा प्रश्नच उरत नाही. भले सोबत कोणी असो वा नसो.

## पंचांग

**सोमवार, ८ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ कृष्ण अष्टमी**
**नक्षत्र : शततारका**



रवी उदय- ०६-०२
रवी अस्त- १९-१४

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कुंभ

**कालाष्टमी; सूर्याचा मृग नक्षत्र प्रवेश दुपारी १.३२, वाहन-बेडूक**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### कढाई व्हेज



★ **साहित्य :** १/४ कप गाजर, १/४ कप फरसबी १/४ कप फ्लॉवर, १/४ कप शिमला मिरची, १ बटाटा, २ कांदे, २ टोमॅटो
२ टेबलस्पून तेल, १/४ टीस्पून हळद, १/२ इंच आलं, ७-८ लसूण पाकळ्या
सुका मसाला..., २ टीस्पून धणे, १ टीस्पून जीरे, १ टीस्पून तीळ, १ लवंग, २ मिरे, १/२ इंच दालचिनीचा तुकडा, २ वेलची, २-३ लाल मिरच्या, इतर.., १ कप गरम पाणी, १ टीस्पून फ्रेश क्रीम, १/४ टीस्पून कसुरी मेथी, १ टेबलस्पून चिरलेली कोथिंबीर, १ टीस्पून मीठ

★ **कृती :** सर्व भाज्या चिरून घेतल्या. सुका मसाला घेतला. भाज्या गरम पाण्यात उकळून घेतल्या.शिमला मिरची सोडून..भाज्या अर्धवट शिजायला हव्यात.सुक्या मसाल्याचे साहित्य तव्यावर भाजून मिक्सरमधून पूड केली.टोमॅटो,आलं,लसूण ची मिक्सरमधून पेस्ट केली. कढईत १ टेबलस्पून तेल घेऊन त्यात कांदा लालसर होईपर्यंत परतला.नंतर त्यात टोमॅटो,आलं,लसूण पेस्ट घालून तेल सुटेपर्यंत परतले. दुसऱ्या कढईत १ टेबलस्पून तेल घालून बाकीच्या अर्धवट शिजवलेल्या भाज्या व शिमला मिरची छान परतून घेतले.नंतर त्यात वाटलेला सुका मसाला, हळद घालून छान परतून घेतले.त्यात गरम पाणी घालून ढवळले. पाणी घालून उकळत असताना त्यात मीठ घातले.झाकण ठेऊन छान शिजवून घेतले.तेल छान सुटून त्याचा तवंग दिसू लागतो.त्यात शिजत आले की फ्रेश क्रीम आणि कसुरी मेथी घालून मिक्स केले.पुन्हा ५ मिनीटे झाकण ठेऊन वाफ दिली. भाजी तयार झाली.मस्त सर्व्हिंग कढईत काढली.गरम पराठे, सलाड,ताक यांसोबत सर्व्ह केली.माझ्याकडे कोथिंबीर नव्हती.नाहीतर कोथिंबीर घालून छान सजवावे.

## क्रीडा



# भारतीय संघाची कसोटीवर मजबूत पकड

## अफगाणिस्तान ४५१ धावांनी पिछाडीवर

**न्यू चंदीगडच्या महाराजा यादविंद्र सिंग स्टेडियमवर सुरू असलेल्या अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव कसोटीवर दुसऱ्या दिवशी भारतीय संघाने आपली पकड मजबूत केली. भारतीय संघाने पहिला डाव ८ बाद ५६४ धावांवर घोषित केल्यानंतर अफगाणिस्तानने दिवसअखेर ५ गडी गमावून अवघ्या ११३ धावा केल्या. त्यामुळे पहिल्या डावाच्या आधारावर अफगाणिस्तानचा संघ अजूनही ४५१ धावांनी पिछाडीवर आहे भारताकडून पदार्पणात मानव सुथारने ३ विकेट घेतल्या.**



पदार्पणात मानव सुथार ३ विकेट घेऊन चमकला

■ चंदीगड

**काल** पहिल्या दिवसाअखेर शुभमन गिल नाबाद १०३, ऋषभ पंत नाबाद ५० धावांवर नाबाद तंबूत परतल्यामुळे भारताने ३ बाद ३६८ धावा केल्या होत्या. या जोडीने सुरुवात चांगली केली. गिलला सलीम साफीने १२६ धावांवर बाद केले. त्यानंतर ध्रुव जुरेललाही १९ धावांवर त्रिफळाचित केले. मात्र रिषभ पंत चांगला खेळत होता. मात्र त्याचा अडथळा अफगाणिस्तानचा कर्णधार हशमतुल्लाने दूर केला. पंत ८१ धावांवर बाद झाला. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने आधी मानव सुथारला आणि मग मोहम्मद सिराजला सोबत घेत डाव पुढे नेला. मानव २८ धावांवर बाद झाला, तर सिराज १२ चेंडू २२ धावांची आक्रमक खेळी करून बाद झाला. तर सुंदरचे अर्धशतक पूर्ण होताच शुभमन गिलने डाव घोषित केला. त्यावेळी भारताच्या १२७ षटकात ८ बाद ५६४ धावा झाल्या होत्या.

या प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा सलामीवीर फलंदाज अब्दुल मलिक आणि सेदिकुल्ला अटल यांनी डावाची संयमी सुरुवात केली होती. मात्र ६ व्या षटकात मानव सुथारकडे गिलने चेंडू सोपवला आणि मानवने पहिल्याच षटकात मलिकला १६ धावांवर माघारी धाडले. त्यानंतर प्रसिद्ध कृष्णाने अटलाही फार वेळ टिकू दिले नाही. त्याने त्याला १७ धावांवर त्रिफळाचित केले. त्यानंतर रेहमनुल्ला गुरबाज आणि रेहमत शाह डाव सावरत होते. परंतु, २० व्या षटकात रेहमनुल्ला गुरबाजला मानव सुथारनेच १२ धावांवर साई सुदर्शनच्या हातून झेलबाद केले. तरी रेहमत शाहला कर्णधार हशमतुल्ला शाहिदीची साथ मिळाली. त्यांनी चौथ्या विकेटसाठी ३६ धावांची भागीदारी केली होती. ही जोडी प्रसिद्ध कृष्णाने तोडली. त्याने शाहिदीला २० धावांवर पायचीत केले. त्यापाठोपाठ मानव सुथारने ४० व्या षटकात अफसर झझाईला ३ धावांवर आपल्याच गोलंदाजीवर झेल घेत बाद केले. त्यामुळे अफगाणिस्तान ५ बाद ११३ धावांवर असताना दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला.

## पहिल्या कसोटीत इंग्लंडचा न्यूझीलंडवर ११५ धावांनी विजय

■ लंडन

**लॉर्ड्स** स्टेडियमवर आज ३ कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्याच्या चौथ्या दिवशी इंग्लंडने न्यूझीलंडवर ११५ धावांनी विजय मिळवून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. इंग्लंडने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५३ धावांचे आव्हान दिले होते. या प्रत्युत्तरात न्यूझीलंडला १३८ धावाच करता आल्याने पराभव पत्करावा लागला. दोन्ही डावांत ७ गडी बाद करणारा इंग्लंडचा ऑली रॉबिन्सन सामनावीर ठरला. इंग्लंडने पहिल्या डावात १४० धावा केल्या होत्या. त्यानंतर इंग्लंडने न्यूझीलंडला ११३ धावांवर गुंडाळले. त्यामुळे इंग्लंडने पहिल्या डावात २७ धावांची आघाडी घेतली. मग दुसऱ्या डावात एमिलिओच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर इंग्लंडने २२६ धावा केल्या. त्यामुळे न्यूझीलंडने २५३ धावांचे आव्हान मिळाले. मात्र तिसऱ्या दिवशी पावसामुळे काही षटकाचा खेळ झाला होता. आज दुसऱ्या डावात न्यूझीलंडच्या फलंदाजांची घसरगुंडी उडाली. संपूर्ण संघ १३८ धावांवर गारद झाल्यामुळे इंग्लंडने ११५ धावांनी हा सामना जिंकला.

## मला वर्चस्व गाजवायचे आहे वैभव सूर्यवंशीचे वक्तव्य

■ कोलंबो



**आयर्लंड** आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारताच्या टी-२० संघात निवड झाल्यानंतर १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आपला निर्धार व्यक्त केला. फक्त खेळायचे नाही तर वर्चस्व गाजवत खेळायचे आहे. पुरस्कार, विक्रम हे सर्व चांगलेच आहे. मात्र संघाला जिंकून देणारा खेळाडू व्हायचे असल्याचे वैभवने सांगितले. वैभव म्हणाला की, लोकांनी माझ्या खेळाच्या परिणामाविषयी बोलायला हवे. जेव्हाही हा खेळाडू खेळतो, तेव्हा एकहाती सामना जिंकून देतो, असे लोकांनी म्हणायला हवे. नुसते खेळलो, खेळत राहिलो, असे मला नको आहे. वर्चस्व गाजवून खेळायचे आहे. त्यासाठीच मी अथक परिश्रम करतो आहे. केवळ दिखाव्यासाठी मी खेळणार नाही. मी पुढची १०-२० वर्षे जेवढी संधी मिळेल तेवढे खेळेन.

## कॅरम स्पर्धेत आर्यन, निधी, तनया, पुष्कर यांची विजयी सलामी

■ मुंबई



**आयडियल** स्पोर्ट्स अकॅडमी व आयडियल ग्रुप आयोजित माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे वाढदिवस चषक १६ वर्षांखालील शालेय विनाशुल्क कॅरम स्पर्धेत जैतापूरच्या न्यू इंग्लिश स्कूलचा आर्यन राऊत, डोंबिवलीच्या पाटकर विद्यालयाची निधी सावंत, वांद्रा येथील महात्मा गांधी विद्यामंदिरची तनया दळवी, मालाडच्या पोद्दार हायस्कूलचा पुष्कर गोळे आदींनी सलामीचे सामने जिंकले. कार्डीनल ग्रेसियस हायस्कूलच्या विराज खरात विरुध्द अचूक फटके साधत आर्यन राऊतने २५-२ असा विजय संपादन केला. परेल येथील आरएमएमएस सभागृहात सुरुवातीपासून आघाडी घेणाऱ्या सुळे गुरुजी शाळेच्या ग्रीष्मा धामणकरला निधी सावंतने निर्णायक क्षणी मोठा बोर्ड घेत ११-७ असे चकविले. अभा टलेलेने प्रारंभ उत्तम करूनही सरळ जाणाऱ्या सोंगट्याचे सातत्य राखणाऱ्या तनया दळवीकडून १४-५ असा पराभव पत्करला. अन्य सामन्यात पुष्कर गोळेने रोहांशू सोळंकीवर १९-१ असा, रत्नागिरीच्या आदित्या देसाईने आर्यन राठोडवर ८-६ असा तर रुद्र पोसरेकरने सार्थक लाडवर १०-४ असा विजय मिळवून दुसरी फेरी गाठली. विविध जिल्ह्यातील ६२ खेळाडूंच्या सहभागाने सुरू झालेल्या स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे, आयडियलचे सल्लागार विलास डांगे, क्रीडाप्रेमी विजय रायमाने, दिलीप वरेकर, नितीन कोलगे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

## ४ बाय १०० मीटर रिले शर्यतीत भारतीय महिला संघाला सुवर्ण

■ नवी दिल्ली

**भारतीय** महिलांच्या ४ बाय १०० मीटर रिले संघाने न्यू तैपेई सिटी ॲथलेटिक्स ओपनमध्ये विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. श्राबनी नंदा, एस. एस. स्नेहा, सुदेशना शिवंकर आणि तमन्ना या चौघींनी तैवानमधील बानकियाओ स्टेडियमवर ४४.०७ सेकंदांची उत्कृष्ट वेळ नोंदवून अव्वल स्थान पटकावले. भारतीय संघाने स्पर्धेचा मागील विक्रम मोडला आणि दुसऱ्या स्थानी राहिलेल्या व्हिएतनामच्या महिला ०.३१ सेकंदांच्या फरकाने मागे राहिला.

भारताच्या तेजस शिरसेने पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक जिंकून ट्रॅकवरही छाप पाडली. कडव्या स्पर्धेत दमदार शर्यत धावून तेजसने दुसरे स्थान पटकावले. या कामगिरीमुळे अडथळा शर्यतीतील त्याची स्थिर प्रगती कायम राहिली. तेजसने यापूर्वी राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. त्याची वेळ १३.५० सेकंद होती. त्याने स्वतःचाच १३.६१ सेकंदांचा स्पर्धेतील विक्रम सुधारला. परंतु राष्ट्रकुल खेळांसाठी पात्र ठरण्याची संधी हुकली. कारण पात्रतेची वेळ १३.३९ सेकंद होती.

## ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमार विश्वचषकानंतर निवृत्त?

■ ब्राझीलिया



**ब्राझीलचा** स्टार फुटबॉलपटू नेमार फिफा विश्वचषकमध्ये खेळून कारकिर्दीतील शानदार कामगिरी करून तो शेवट गोड करू शकतो, अशी चर्चा आहे. नेमारने सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमुळे त्याच्या भविष्याबद्दल चर्चा सुरू झाली. अनेक जण त्याच्या या पोस्टचा अर्थ असा लावत आहेत की, तो विश्वचषकानंतर आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्त होईल.

फिफाने अलीकडेच नेमारच्या कारकिर्दीतील अविस्मरणीय छायाचित्रांसह एक पोस्ट शेअर केली, ज्यावर लिहिले होते, आम्ही त्याला मोठे होताना पाहिले आहे. नेमारने ब्राझीलसाठी १२८ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि ७९ गोलांसह तो देशाचा आतापर्यंतचा सर्वाधिक गोल करणारा खेळाडू आहे.

## भारत ७ वर्षांनंतर दक्षिण आशियाई फुटबॉल चॅम्पियन

■ पणजी




**गोव्यातील** मडगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये भारतीय महिला फुटबॉल संघाने ७ वर्षांनंतर दक्षिण आशियाई फुटबॉल चॅम्पियनशिप जिंकली. त्यांनी काल रात्री झालेल्या अंतिम सामन्यात गतविजेत्या बांगलादेशला ३-१ ने हरवले. भारताने विक्रमी सहाव्यांदा ही स्पर्धा जिंकली. भारतासाठी प्यारी जाख्सा, सनफिदा नोंगरुम आणि लिंडा कोम सेर्तो यांनी प्रत्येकी एक गोल केला. बांगलादेशसाठी रितु पोर्णाने एकमेव गोल केला.

भारताकडून प्यारी जाख्साने ४२ व्या मिनिटाला पहिला गोल केला. पहिल्या हाफच्या इंजरी टाईममध्ये रितू पोर्णा चकमाने गोल करून बांगलादेशला बरोबरी साधून दिली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला सनफिदा नोंगरुमने शानदार हेडर लावून भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भारतीय संघाने खेळावर नियंत्रण ठेवले. ८२ व्या मिनिटाला लिंडा कोम सेर्तोने बांगलादेशी बचावफळीच्या चुकीचा फायदा घेत तिसरा गोल केला आणि भारताचा विजय निश्चित केला.

# सुख शांती समाधान

## सोमवती अमावस्येला हे उपाय करा...

**ज्या अमावास्येला सोमवार येतो त्या अमावास्येला सोमवती अमावास्या म्हणतात. अमावास्या प्रत्येक महिन्यात येते. पण, सोमवारी अमावास्या येण्याचा योग मात्र फार कमी वेळा येतो. म्हणून सोमवती अमावास्या खास आहे. हिंदू धर्मात सोमवती अमावास्येला खूप महत्त्व आहे. हा दिवस भगवान शिव आणि पूर्वजांना समर्पित आहे. ही अमावास्या पितरांच्या आशीर्वादासाठी आणि वैवाहिक सुखासाठी वरदान ठरते. या दिवशी दान आणि उपवासाला विशेष महत्त्व आहे. दर्श अमावास्या १४ जून रोजी १२.२० मिनिटांनी सुरू होते. दुसऱ्या दिवशी म्हणजेच १५ जून रोजी सकाळी ८.२४ ला संपते. परंतु हिंदू कालगणनेत उदयतिथीला मानली जाते. म्हणून अमावास्या सोमवारी १५ जून रोजी साजरी केली जाईल.**



✓ सोमवती अमावास्येला जवळपासच्या झाडांवर बसलेल्या कावळ्यांना व तलावातील मासोळ्यांना तांदूळ व तुपाने तयार लाडू खाऊ घालावा. याने पितृदोष दूर होतो.

✓ सोमवती अमावास्येच्या दिवशी पितरांच्या आत्म्याच्या शांतीसाठी पूजा आणि पिंडदान केले जाते. म्हणूनच या दिवशी पितरांबद्दल वाईट बोलू नये आणि त्यांना तर्पण द्यायला विसरू नये.

✓ सोमवती अमावास्येला एका ब्राह्मणाला भोजन व दक्षिणा किंवा वस्त्रदान केल्याने पितृ दोष दूर होतो.

✓ या दिवशी पूर्वजांसाठी दान करा. या दिवशी जनावरांना हिरवा चारा द्यावा. शक्य असल्यास घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रकाश पडेल अशी व्यवस्था करा.

✓ पितृदोषापासून मुक्ती मिळविण्यासाठी, सोमवती अमावास्येच्या दिवशी काळे तीळ दान करावे. या उपायाने, तुम्हाला तुमच्या पूर्वजांचे आशीर्वाद तर मिळतातच, पण तुमच्या कारकिर्दीतही समृद्धी येते.

✓ या दिवशी भगवान शिव यांना प्रसन्न करण्यासाठी शिवलिंगावर गंगाजल आणि बिल्वपत्र अर्पण करावे. हा उपाय केल्याने तुम्हाला पैसे आणि धान्याशी संबंधित समस्यांपासून आराम मिळतो.

✓ सोमवती अमावास्येला सूर्योदयापूर्वी उठून स्नान करणे महत्त्वाचे असते. जो व्यक्ती या दिवशी उशिरापर्यंत झोपतो, त्याच्या कुंडलीतील चंद्र आणि शनी खराब होतात. तसेच, या दिवशी कोणाशीही भांडण, वाद किंवा कोणाचा अपमान करू नका. विशेषतः घरातील स्त्री किंवा वडिलांचा अपमान केल्यास पितर संतप्त होतात.

✓ शनि देवाच्या साडेसातीचे दुष्परिणाम टाळण्यासाठी सोमवती अमावास्येच्या दिवशी शनि देवाला मोहरीचे तेल अर्पण करावे.

✓ सोमवती अमावास्येला पिंपळाच्या झाडाला जानवे अर्पित करावे. प्रभू विष्णुच्या नावाचे एक जानवे आणखी पिंपळाला अर्पित करून प्रार्थना करावी. नंतर १०८ वेळा प्रदक्षिणा घालाव्या. पिंपळाला गोडाचा नैवेद्य दाखवावा. प्रदक्षिणा घालताना 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' मंत्राचा जप करावा. नंतर कळत-नकळत आपल्याकडून घडलेल्या चुकांची क्षमा मागावी.

✓ सोमवती अमावास्येला निम्न मंत्र जाप करावा. मंत्र- 'अयोध्या, मथुरा, माया, काशी कांचीर्‌अवन्तिका पुरी, द्वारावतीश्चैव सप्तैता मोक्ष दायिका।।

गंगे च यमुनेश्चैव गोदावरी सरस्वती, नर्मदा, सिंधु कावेरी जलेस्मिने संन्निधि कुरु।।'

✓ अमावास्येला आध्यात्मिक चिंतन व पूजन-अर्चन करणे उत्तम ठरते.

✓ सोमवती अमावास्येच्या दिवशी तुम्ही दूध आणि तांदळाचे दान आवश्यक करा. त्यामुळे तुम्हाला आर्थिक त्रासातून मुक्ती मिळेल. काही कारणाने जर पित्र तुमच्यावर नाराज असतील तर त्यांची नाराजी दूर होईल.

✓ जर एखाद्याला चंद्र ग्रहाची महादशा असेल, तर सोमवती अमावास्येच्या दिवशी तांदूळ, कापूर, मोती, शंख, चांदीचे दान करावे. यामुळे चंद्राची स्थिती मजबूत होते.

✓ हिंदू धर्मात पिंडदानाला फार महत्त्व आहे. काही कारणांनी जर तुम्ही पितरांचे पिंडदान केले नसेल तर सोमवती अमावास्येला पिंडदान आवश्यक करावे. त्यामुळे पितरांचा अतृप्त आत्मा संतुष्ट होतील.

✓ एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत चंद्राचा अशुभ प्रभाव असल्यास गाईला हिरवा चारा, दही, पोळी आणि तांदूळ खाऊ घालावेत.

## शुक्र प्रदोष व्रतामुळे दूर होतील अडचणी

**शुक्रवार हा धनाची देवी लक्ष्मीला समर्पित मानला जातो. या दिवशी योग्य विधी करून लक्ष्मीची पूजा केल्यास शुभ फळे मिळतात. यावर्षी प्रदोष व्रत शुक्रवारसोबत आहे. यामुळे हा दिवस आणखी खास बनतो. ज्योतिषशास्त्रानुसार, जर तुम्ही शुक्रवारी काही खास उपाय केल्यास तुम्हाला देवी लक्ष्मी तसेच महादेवांचे आशीर्वाद मिळतात. याव्यतिरिक्त, तुम्हाला जीवनात आनंद, समृद्धी आणि सौभाग्य मिळू शकते. शुक्रवारी कोणते उपाय करायचे ते जाणून घ्या**

आजच्या शुक्रवारी १२ जून २०२६ रोजी, प्रदोष व्रत येत आहे. या दिवशी भगवान शंकराची पूजा केल्यास खूप शुभ फळ मिळतं. ज्योतिषशास्त्रानुसार,



या दिवशी शिवलिंगाशी संबंधित काही खास उपाय केल्यास भोलेनाथाच्या कृपेने जीवनातील दुःख पीडा दूर होऊ शकतात. तसेच, सुख, समृद्धी आणि सौभाग्य प्राप्त होते.

शुक्रवारी स्नान झाल्यानंतर, स्वच्छ कपडे परिधान करा. या दिवशी गुलाबी किंवा चमकदार रंगाचे कपडे घालणे शुभ मानले जाते. त्यानंतर, भगवान शिव आणि देवी लक्ष्मीची विधीनुसार पूजा करा. सकाळी देवी लक्ष्मीला गुलाब अर्पण करा आणि तुळशीच्या रोपाला पाणी घाला. त्यानंतर, संध्याकाळी, लक्ष्मी देवीची आरती करताना कापूर घाला आणि तुळशीच्या रोपाजवळ दिवा लावा. हा उपाय केल्याने देवी लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो. घरामध्ये आनंदाचे वातावरण राहील.

प्रदोष व्रत शुक्रवारी असते. या दिवशी भगवान शिव खूप उदार असतात. म्हणून, या दिवशी भगवान शिव यांना गंगाजल, मध, दही आणि इतर औषधी वनस्पतींनी अभिषेक करावा. तसेच त्यांना बेलाची पाने अर्पण करावीत. असे केल्याने भगवान शिव लवकर प्रसन्न होतात आणि व्यक्तीला त्यांचे विशेष आशीर्वाद मिळू शकतात असे मानले जाते. अभिषेक केल्यानंतर भगवान शिवाची विधीवत पूजा आणि आरती देखील करावी.

जर तुमच्या जीवनामध्ये एकामागून एक समस्या येत असल्यास किंवा आर्थिक संकट येत असेल तर शुक्रवारी काही उपाय करणे फायदेशीर ठरते. देवी लक्ष्मीची पूजा करताना काही पिवळ्या कवड्या आणि ताजी गुलाबाची फुले अर्पण करा. त्यानंतर, ओम श्रीं ह्रीं क्लीम महालक्ष्म्यै नमः या मंत्राचा किमान १०८ वेळा जप करा. हा उपाय केल्याने आनंद आणि सौभाग्य वाढते आणि आर्थिक समस्यांपासून मुक्तता मिळते.

प्रदोष व्रताच्या दिवशी महादेव आणि देवी पार्वतीची पूजा करावी. देवीला शृंगाराचे साहित्य अर्पण करा आणि ॐ नमः शिवाय या मंत्राचा १०८ वेळा जप करा. हा उपाय केल्याने व्यक्तीला वैवाहिक जीवनातील समस्यांपासून मुक्तता मिळू शकते. प्रदोष व्रताच्या दिवशी संध्याकाळी महामृत्युंजय मंत्राचा जप करावा. यामुळे जीवनातील अडथळ्यांपासून मुक्तता मिळू शकते.

## आतापर्यंत अधिक महिन्यात काही करता आले नाही तर शेवटच्या दिवशी हे उपाय करा...

**जर तुम्हाला संपूर्ण अधिक महिन्यात (पुरुषोत्तम मास) कोणतीही पूजा, जप किंवा व्रत करता आले नसेल, तर काळजी करण्याची गरज नाही. तुम्ही शेवटच्या दिवशी खालील सोपे आणि प्रभावी उपाय करू शकता, ज्याने संपूर्ण महिन्याचे पुण्य प्राप्त होऊ शकते.**

शेवटच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करा. भगवान विष्णू किंवा श्रीकृष्ण मंदिरात जाऊन किंवा घरीच 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करा शक्य असल्यास 'विष्णू सहस्त्रनाम' किंवा 'पुरुषोत्तम महात्म्य' यांचे पठण करावे.

अधिक महिन्यात ३३ या संख्येला मोठे महत्त्व आहे. शेवटच्या दिवशी ३३ अनारसे, ३३ दिवे (दीपदान) किंवा ३३ फळे ब्राह्मणाला किंवा गरजू व्यक्तीला दान करा. यामुळे घरातील दारिद्र्य दूर होते असे मानले जाते.

शेवटच्या दिवशी सायंकाळी तुळशीजवळ तुपाचा दिवा लावून तुळशीला प्रदक्षिणा घालावी. यामुळे घरात सुख, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जा येते.

तुमच्या क्षमतेनुसार शेवटच्या दिवशी एखाद्या गरजू किंवा अनाथ आश्रमात जाऊन अन्नदान करा किंवा गरिबांना वस्त्रदान करा.

हे देवा, माझ्याकडून संपूर्ण अधिक महिन्यात कोणतीही सेवा किंवा व्रत झाले नाही. त्याबद्दल मला क्षमा कर आणि माझ्यावर तुझी कृपा राहू दे. या दिवशी केलेले शुद्ध मनाने दान आणि नामस्मरण तुम्हाला संपूर्ण महिन्याचे फळ मिळवून देऊ शकते.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

## ५० जागी म्हाडाच्या संरक्षण भिंतीच्या कामात अडथळे




■ मुंबई

**उपनगरातील** पूर्व-पश्चिम भागातील दरडीलगत पावसाळ्यापूर्वी संरक्षण भिंती बांधण्याची ३१ मे पर्यंत डेडलाईन होती. मात्र या कामात अनेक अडथळे आल्याने ५० जागी कामे रखडली आहेत. मात्र जून महिन्यात कामे होणे अपेक्षित आहे, पण पावसाची चिंता सतावत आहे. अशी धक्कादायक माहिती म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या कार्यालयातून देण्यात आली.

शहरसह उपनगरातील ज्या वस्तीतून पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका आहे अशा एकूण १३६ जागी म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या माध्यमातून संरक्षण भिंती बांधण्याची कामे एप्रिल महिन्यात सुरू करण्यात आली. यातील आतापर्यंत ८६ जागी कामे पूर्ण झाली आहेत. तर ५० ठिकाणी काही कामाच्या जागी पालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्यांची कामे सुरू आहेत. तर दरडीलगत झोपड्यांचा अडथळा आहे. या कारणाने संरक्षण भिंतीच्या कामांनी गटांगळ्या खाल्ल्या आहेत. अशी माहिती देऊन या मंडळातील अभियंता पुढे म्हणाला, रखडलेल्या संरक्षण भिंतीची कामे जून महिन्यापर्यंत पूर्ण होतील. परंतु अचानक पाऊस बरसल्यास चिंतेचा विषय ठरणार आहे.

## रुग्णालयात स्ट्रेचरच मिळाला नाही महिलेची पतीला पाठीवर घेऊन धावाधाव

अकोल्याचा व्हिडिओ व्हायरल

■ अकोला

**अकोल्यातील** सर्वोपचार रुग्णालयात आजारी पतीला उपचारासाठी आणलेल्या एका महिलेला स्ट्रेचर किंवा तातडीची मदत न मिळाल्याने तिने पतीला पाठीवर घेऊन रुग्णालयातील विविध विभागांत धावपळ करावी लागली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकारामुळे शासकीय आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

संबंधित महिला दुपारी आपल्या पतीला उपचारासाठी सर्वोपचार रुग्णालयात घेऊन आली होती. पतीची प्रकृती गंभीर असल्याने तातडीने उपचारांची गरज होती. मात्र, रुग्णालयात दाखल झाल्यानंतर तिला अपेक्षित मदत मिळाली नाही. स्ट्रेचर किंवा तत्काळ वैद्यकीय मदत मिळत नसल्याने महिलेने नर्स, वॉर्डबॉय आणि डॉक्टरांकडे वारंवार विनवण्या केल्या. मात्र प्रतिसाद न मिळाल्याने तिने आपल्या पतीला पाठीवर घेत उपचारासाठी विविध विभागांत धावाधाव केल्याचे व्हिडिओमध्ये दिसते.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर रुग्णालय प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेतली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय सोनुने यांनी सांगितले की, संबंधित रुग्णाला उपचार नाकारले नव्हते. मात्र नेमकी घटना काय घडली, रुग्णाला कोणत्या विभागात नेले आणि त्यावेळी ड्युटीवरील कर्मचाऱ्यांनी काय कार्यवाही केली, याची सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली आहे. प्रशासनाने घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांकडून अहवाल मागविला असून, व्हिडिओतील सर्व बाबींची पडताळणी केली जात आहे.

चौकशीत कोणत्याही कर्मचाऱ्याचा निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाईल.

## मोतीलाल नगरातील झाडांवर पालिका कुऱ्हाड चालविणार

**मुंबई-** एका बाजूला जागतिक पर्यावरण दिन साजरा होत असताना दुसऱ्या बाजूला गोरेगावच्या मोतीलाल नगरातील अनेक वर्षे जुनी असलेली ५४ झाडांवर पालिकेचे उद्यान विभाग कुऱ्हाड चालविणार आहे. तर ७७ झाडे पुनर्रोपित करणार आहे, अशी माहिती हाती आली आहे. महापालिकेच्या पी-दक्षिण कार्यालयाच्या वृक्ष प्राधिकरणाने जारी केलेल्या सुचनेनुसार पत्रकात असे म्हटले आहे की, मोतीलाल नगर वसाहतीचा म्हाडा सी अँण्ड डी अंतर्गत समूह पुनर्विकास करणार आहे. येथील नगरभूमापन क्रमांक २४०, २४२, २४३, २४८, २५२ ते २५४ या ठिकाणी असलेल्या एकूण १३१ झाडांपैकी ५४ झाडे कापण्यात येणार आहेत. तर उर्वरित ७७ झाडे पुनर्रोपित केली जाणार आहेत. वृक्ष संगोपन व संवर्धन करण्याचा संदेश देणारी पालिका येथील झाडे कापणार असल्याने वृक्षप्रेमी नागरिक काय भूमिका घेतात हे पाहावे लागेल.

## पतीचा काटा काढण्यासाठी पत्नीची सुपारी

**कराड- कराडमध्ये** एका हॉस्पिटलसमोर ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे जलसंधारण विभागात अभियंता म्हणून कार्यरत असलेले लक्ष्मण मंडले (५४) यांचा अपघातात मृत्यू झाला होता. मात्र हा अपघात नसून हत्या असल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी पत्नी सुरेखा मंडले (३६) आणि मेहुणा संग्राम चव्हाण (४०) यांना अटक केली आहे.

## भूसंपादन घोटाळा प्रकरणात माजी जिल्हाधिकाऱ्यांचा जामीन फेटाळला

■ बीड

**धुळे-सोलापूर** राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणात अटकेत असलेल्या बीडच्या माजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. बीड सत्र न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. या प्रकरणात, बदलीनंतरही बॅकडेट सह्या करून वाढीव मावेजा मंजूर केल्याचा गंभीर आरोप पाठक यांच्यावर आहे. १ मार्च ते १७ एप्रिल २०२५ या ४८ दिवसांच्या कालावधीत त्यांनी १५४ प्रकरणांमध्ये सुमारे २४१ कोटी रुपयांचा वाढीव मावेजा मंजूर केला. मूळ ६८ कोटी रुपयांचा मावेजा तब्बल ३१० कोटींवर नेण्यात आल्याचे चौकशीत उघड झाले आहे. यापैकी ७३ कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरितही करण्यात आले होते.

विद्यमान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले. अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानंतर या प्रकरणी १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामध्ये ५ वकिलांचाही समावेश आहे. ७ दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर पाठक यांना १५ मे रोजी न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी जामिनासाठी अर्ज केला होता.

## महागाईविरोधात उबाठाचे छ. संभाजीनगरात आंदोलन

■ छत्रपती संभाजीनगर

**वाढती** महागाई, पेट्रोल-डिझेल दरवाढ आणि इतर आर्थिक मुद्द्यांवरून उबाठाने छत्रपती संभाजीनगरच्या क्रांती चौकात जोरदार आंदोलन केले. उबाठाचे आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलान पार पडले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी हातात रिकाम्या गॅसच्या टाक्या, थाळ्या आणि लाटण्या घेत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाल्याचा आरोप करत आंदोलकांनी संताप व्यक्त केला.

अंबादास दानवे म्हणाले की, हे आंदोलन केवळ महागाईविरोधात नाही, तर इंधन दरवाढ आणि अपूर्ण कर्जमुक्तीच्या आश्वासनाविरोधातही आहे. २०१४ मध्ये महागाई कमी करण्याचे आश्वासन देत सत्तेत आलेल्या सरकारने जनतेची फसवणूक केली आहे.

**जाहीर नोटीस**

माझे अशील **श्री. डॉ. अरविंद बाबाजी दाभोळकर** वय वर्षे ७८ आणि **सौ. डॉ. शैलजा अरविंद दाभोळकर** वय वर्षे ७६ हे दोघेही ज्येष्ठ नागरिक आहेत. माझे अशील हे गोकुळ क्रिसेंट ए/४०२, कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९ येथे राहतात. माझ्या अशीलांची मोठी बहिण **कु. शालीनी बाबाजी दाभोळकर** वय वर्षे ८६ ही प्रियदर्शिनी २ए सदनिका नंबर १०१, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०००२८ येथे एकटी राहते. माझ्या अशीलांच्या वयोमानानुसार आणि आजारपणामुळे माझे अशील तिची काळजी घेण्यास असमर्थ आहेत. तरी माझ्या अशीलांच्या बहिणीच्या बाबतीत कोणतीही अघटीत घटना घडली तर त्याची जबाबदारी माझ्या अशीलांवर राहणार नाही यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

दिनांक. ०५/०६/२०२६
ठिकाण : मुंबई

सही/-
ॲड्व्होकेट
प्रविण बाणे

अर्ज क्र. आयएनसी-२६
केंद्र सरकार विभागीय संचालक, पश्चिम विभाग (मुंबई)
कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यांच्या समक्ष
कंपनी कायदा, २०१३च्या कलम १२ च्या उप कलम (५) आणि
कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या नियमन २८ च्या प्रकरणात
आणि
एन्डरेस + हौजर (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालय: ७बी, ७ वा मजला, गोदरेज वन बिल्डींग, फिरोजशानगर, पूर्व द्रुतगती महामार्ग, विक्रोळी (पू), मुंबई - ४०००७९
सीआयएन: U24110MH1999PTC121643 ("कंपनी") यांच्या प्रकरणात
... याचिकाकर्ता

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी त्यांचे कंपनी निबंधक, मुंबई - I यांच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारे नोंदणीकृत कार्यालय **कंपनी निबंधक, मुंबई - II च्या कार्यक्षेत्रात** बदलण्यास कंपनीस सक्षम करण्याकरिता सोमवार, दि. २५ मे, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये पारित करण्यात आलेल्या विशेष ठरावानुसार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यामध्ये कंपनी निबंधक, मुंबई - I येथून कंपनी निबंधक, मुंबई - II येथे स्थलांतरित करण्याकरिता मंजुरी मिळविण्यासाठी, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२(५) अन्वये **केंद्र शासन/विभागीय संचालक, पश्चिम विभाग** यांच्याकडे अर्ज करण्याचे कंपनी प्रस्तावित आहे.

कोणी व्यक्ती, ज्यांचे हितसंबंध कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे बाधित होत असल्यास त्यांनी **एकतर एमसीए-२१ पोर्टल (www.mca.gov.in)** येथे गुंतवणुकदार तक्रार अर्ज भरून किंवा त्याचे/तिचे आक्षेप, त्याच्या/तिच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि विरोधाची कारणे नमूद केलेले प्रतिज्ञापत्र **विभागीय संचालक, पश्चिम विभाग, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरिन ड्राईव्ह, मुंबई-४००००२, महाराष्ट्र, भारत** येथे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत स्वत: किंवा अन्य कोणाही तर्फे पोहोचवावे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे व त्याची प्रत अर्जदार कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयास खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर पाठवावी.

**नोंदणीकृत कार्यालय: ७बी, ७ वा मजला, गोदरेज वन बिल्डींग, फिरोजशानगर, पूर्व द्रुतगती महामार्ग, विक्रोळी (पू), मुंबई - ४०००७९.**

**एन्डरेस + हौजर (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड करिता**

**सही/-**
**कैलाश परशुराम देसाई**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन:** ०७९५९४८०
**पत्ता:** बी-३०३, ३रा मजला, बी-विंग, फॅन्टासिया, रहेजा गार्डन, एलबीएस मार्ग, तीन हात नाका, ठाणे (पश्चिम), पिन - ४००६०४.
दिनांक: ०८.०६.२०२६
ठिकाण: ठाणे

**सही/-**
**प्रसाद श्रीकांत डांगे**
**संचालक**
**डीआयएन:** ११५८८९१८
**पत्ता:** ११०४, विन्स्टन रिजेन्सी हाईट, कोलशेत रोड, ब्रह्मांड फेज - १, ठाणे पश्चिम, महाराष्ट्र ४००६०७.
दिनांक: ०८.०६.२०२६
ठिकाण: ठाणे

**जाहीर सूचना**

सर्वसामान्य जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आमचे अशील **श्रीमती धारा हरीश देढिया आणि श्री. हरीश गंगजी देढिया** यांच्याकडून त्यांच्या फ्लॅट क्र.२३०३ (ज्याचे सविस्तर लिखित वर्णन खालील अनुसूचीत दिलेले आहे) खरेदी करण्याबाबत वाटाघाटी करीत आहेत, जे त्यांनी ग्लायडर बिल्डकॉन रिआल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड **(त्यातील विकासक म्हणून संदर्भित) आणि** ओमकार रिआल्टर्स प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड **(त्यातील ओआरपीपीएल म्हणून संदर्भित)** यांच्याकडून दिनांक २१ डिसेंबर २०१८ रोजी करण्यात आलेल्या विक्री करारान्वये संपादित केला असून, सदर करार दस्तऐवज क्र. १३८१४/२०१८ अन्वये विधिपूर्वक नोंदणीकृत आहे.

कोणतीही व्यक्ती / संस्था, ज्यामध्ये व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपनी, बँक, वित्तीय संस्था, बिगर-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म, व्यक्तींची संघटना किंवा व्यक्तींचा समूह, नोंदणीकृत असो वा नसो, कर्जदाता आणि/किंवा धनको यांचा समावेश असून त्यापुरतेच मर्यादित नसून, खालील अनुसूचीत वर्णन केलेल्या प्रिमायसेसबाबत आणि/किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत वारसा, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाण, तारण, शुल्क, वाटप, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, अभिहस्तांकन, वहिवाट, भेट, मुक्तता, अदलाबदल, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड/वाटणी, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देखभाल, सुखाधिकार, न्यास, ताबा, कौटुंबिक हक्क किंवा कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करार, भागीदारी, मार्गाचा हक्क, प्रलंबित वाद, आरक्षण, संपादन, सामंजस्य करार, विक्रीचा करार, मुखत्यारपत्र, पर्याय हक्क, वाटप, प्रथम नाकाराचा हक्क, पूर्वखरेदीचा हक्क किंवा कोणत्याही प्रकारचे दायित्व, बांधिलकी अथवा इतर कोणताही हक्क, दावा, आक्षेप, हितसंबंध, लाभ किंवा अधिकार असल्यास, त्यांनी त्या संदर्भातील सर्व कागदोपत्री पुराव्यांसह त्याची लेखी माहिती या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोलिखितांना कळवावी, अन्यथा, अशा व्यक्ती/संस्थांचे हक्क, शिर्षक, दावे, आक्षेप, लाभ, पात्रता, मागण्या आणि/किंवा हितसंबंध, असल्यास, त्यांनी जाणीवपूर्वक व स्वेच्छेने त्यागलेले किंवा सोडून दिलेले मानले जातील.

**वर संदर्भित प्रिमायसेसची अनुसूची**

लोअर परळ विभागातील जी/दक्षिण विभागामधील सी.एस. क्र. १ (भाग), २ (भाग) आणि ३ (भाग) या जमिनीवर बांधण्यात आलेल्या पिरामल महालक्ष्मी येथील **सेंट्रल टॉवर – टॉवर २** या इमारतीतील, २३व्या निवासी मजल्यावरील, रेरा नुसार १६३.०६ चौ.मीटर क्षेत्रफळ असलेला फ्लॅट क्र.२३०३, त्यास संलग्न ५.५५ चौ. मीटर क्षेत्रफळाची बाल्कनी, ४.७४ चौ. मीटर क्षेत्रफळाची ड्राय बाल्कनी तसेच ३ आच्छादित कार पार्किंग जागांसह, जी मालमत्ता जी. बी. सकपाळ मार्ग आणि साने गुरुजी रोड/कमलकांत सिंग मार्ग, धोबीघाट, सातरस्ता, मुंबई–४०००११ येथे स्थित आहे.

आज दिनांकित ८ जून, २०२६ रोजी

**सही/-**
**बिलावाला अँड कंपनी**
**वकील आणि सॉलिसिटर्स**
**खरेदीदारांसाठी**
करीम चेंबर्स, २रा मजला,
अंबालाल दोषी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३

रामेश्वर मीडिया

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**(बृहन्मुंबई महानगरपालिका)**
**विक्रोळी वाहतूक विभाग**

**श्री. सुधाकर देवसिंग राठोड,** बसचालक ०१४१७२, वे. पू. क्र. २२/१३, विक्रोळी आगार आपण दिनांक १०.१२.२०२४ पासून दि. ११.१२.२०२५ पर्यंत न कळविता एकूण ३६५ दिवस गैरहजर असल्याने स्थायी आदेश २० (एफ) - परवानगीशिवाय सतत पंधरा दिवसांपेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर राहणे व स्थायी आदेश क्र. २० (के) - कोणत्याही विभागामध्ये कामासाठी आणि सुव्यवस्थेसाठी केलेले नियम, विनियम व आज्ञा यांचा भंग करणे, (सूचना क्र. २७१/०५, दि. ०१.०८.२००५ - वाहतूक बाह्य कर्मचारांच्या कामावरील अनुपस्थितीबाबत) या अन्वये आपणाविरुद्ध आरोपपत्र ठेवण्यात आले आहे. परंतु सदर आरोपपत्र आपण गैरहजर असल्यामुळे आपणावर बजावता आले नाही.

परिचय क्र. ०१४१७२ आरोपपत्र क्र. अनुपस्थिती/ आरोपपत्र/ विक्रोळी - ०२/२०२६ दि. ०६/०१/२६ रोजी बजावण्यात आले होते. सदर आरोपपत्राची चौकशी दि. २८/१/२०२६ रोजी सकाळी १४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. या चौकशी दरम्यान आपण गैरहजर राहिले. आपण गैरहजर असल्यामुळे सदर आरोपपत्राच्या चौकशीस उपस्थित राहण्यासंदर्भात उपक्रमाकडे उपलब्ध असलेल्या आपल्या मुंबईच्या पत्त्यावर ज्ञापन दि. १९/१/२०२६ हं. बस निरीक्षक क्र. ०९७४३० यांच्या मार्फत पाठवण्यात आले असता आपण तेथे रहात नसल्यामुळे आपल्या मुळच्या गावाच्या पत्त्यावर दि. ११.०२.२०२६ रोजी सदर आरोपपत्राची चौकशी दि. २०/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्याबाबत ज्ञापन व आरोपपत्राची प्रत नोंदनीकृत पोस्टद्वारे आपणास विभागीय पत्र पाठविण्यात आले होते, परंतु पोस्टमन यानी सदर पत्रावर (door lock) असा शेरा मारून सदर पत्र उपक्रमाकडे परत पाठवले.

सबब, आपल्याविरोधाच्या आरोपपत्राची सुनावणी विक्रोळी वाहतूक कार्यालय, विक्रोळी आगार, लालबहादुर शास्त्री मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०७९ येथे बुधवार वार, दि. १५/०६/२०२६. रोजी सकाळी ११.०० वा. वरिष्ठ वाहतुक अधिकारी (विक्रोळी) यांच्यासमोर आयोजित केली आहे. तरी आपण सदर दिवशी व वेळी आपल्या बचाव प्रतिनिधी व साक्षीदारांसह (असल्यास) सुनावणीस उपस्थित रहावे. सदर सुनावणीत आपण अनुपस्थित राहिल्यास सुनावणीचे कामकाज आपल्या गैरहजेरीत एकतर्फी चालविण्यात येईल व चौकशीचा आदेश आपणांवर बंधनकारक राहिल याची नोंद घ्यावी.

बृ. मुं. वि. पु. आणि प. उपक्रमाकरिता
सही/-
( संजय ल. कडाळी )
वरिष्ठ वाहतूक अधिकारी (विक्रोळी)
चौकशी अधिकारी

संदर्भ क्र. जसंअ/ववाअ/काकि/जाहिरात/२४/पत्रव्यवहार/५१०६/२०२६
दि. ०३/०६/२०२६

# आर. ग्रोव्हरचा नवीन संगीत प्रकल्प



**नुकत्याच** प्रदर्शित झालेल्या 'सय्यारा' या गाण्याच्या यशानंतर, प्रसिद्ध गायक शान आणि अभिनेता-गायक आर ग्रोव्हर यांनी त्यांच्या नवीन संगीत प्रकल्पाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. मध्य प्रदेशची राजधानी असलेल्या भोपाळ आणि त्याच्या आसपासच्या निसर्गरम्य परिसरामध्ये या आगामी गाण्याचे चित्रीकरण पार पडले आहे.

'सय्यारा' या गाण्याला संगीतप्रेमींकडून मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे या जोडीचा उत्साह वाढला असून, त्यांनी लगेचच या नवीन गाण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. भोपाळमधील काही अतिशय देखण्या आणि ऐतिहासिक ठिकाणी या गाण्याचे चित्रीकरण करण्यात आले आहे. या नव्या प्रकल्पात गाण्यासोबतच एक सुंदर कथाही प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. हे गाणे कधी प्रदर्शित होणार, याविषयीची अधिकृत माहिती अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहे. मात्र, शान आणि आर ग्रोव्हर या जोडीचे हे नवीन गाणेसुद्धा प्रेक्षकांना एका वेगळ्या संगीतमय प्रवासावर घेऊन जाईल, यात शंका नाही.

# 'बंटवारा'साठी आमीरचा पुढाकार

**आमिर खान,** सनी देओल आणि दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांच्या बहुप्रतीक्षित 'लाहोर १९४७' या चित्रपटाच्या शीर्षकात (टायटल) मोठा बदल करण्यात आला असून, आता हा चित्रपट 'बंटवारा' या नावाने प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या शीर्षकाचे हक्क मिळवण्यासाठी स्वतः निर्माता आमिर खानने घेतलेल्या पुढाकारामुळे हा



महत्त्वपूर्ण बदल शक्य झाला आहे. या चित्रपटाचे नाव आधी 'लाहोर १९४७' असे निश्चित करण्यात आले होते. मात्र, एका पाकिस्तानी शहराचे नाव मुख्य शीर्षकात असण्याऐवजी फाळणीची दाहकता अधोरेखित करणारे नाव असावे, असे मत चित्रपट निर्मिती चमूचे (टीम) बनले. या विचारातून आधी 'बंटवारा १९४७' या नावावर चर्चा झाली, पण शेवटी केवळ 'बंटवारा' हेच नाव सर्वाधिक प्रभावी ठरेल यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

मुख्य अडचण अशी होती की, 'बंटवारा' या शीर्षकाचे कायदेशीर हक्क दिवंगत चित्रपट निर्माते सलीम अख्तर यांच्या कुटुंबाकडे होते. सलीम अख्तर यांनी १९८९ मध्ये 'बंटवारा' नावाचा एक यशस्वी चित्रपट बनवला असल्याने या नावाचे हक्क त्यांच्याकडेच राखीव होते.

हा तिढा सोडवण्यासाठी ज्येष्ठ चित्रपट निर्माते करीम मोराणी यांनी मध्यस्थी केली. त्यांनी आमिर खान आणि सलीम अख्तर यांचे सुपुत्र समद अख्तर यांची भेट घडवून आणली. यानंतर आमिर खानने थेट समद यांच्या घरी जाऊन त्यांची आणि सलीम अख्तर यांच्या पत्नी शमा यांची भेट घेतली.

# परिणीतीचे अध्यात्मिक वळण



**अभिनेत्री** आणि गायिका परिणीती चोप्रा हिने आपल्या कलाविश्वातील प्रवासाला एक नवीन आणि अध्यात्मिक वळण दिले आहे. परिणीतीने सोशल मीडियावर तिच्या आगामी अध्यात्मिक संगीत प्रकल्पाची (स्पिरिच्युअल म्युझिकल प्रोजेक्ट) पहिली झलक (टीझर) सादर केली असून, तिचे हे पहिले भक्तिगीत आज म्हणजे ८ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या गीताची झलक शेअर करताना तिने सोशल मीडियावर 'एक प्रार्थना, एक अर्पण. लवकरच येत आहे!' अशा आशयाची पोस्ट लिहिली आहे. परिणीतीने यापूर्वी तिच्या काही चित्रपटांमधून आणि थेट कार्यक्रमांमधून आपल्या गायनाची चुणूक दाखवली असली, तरी संपूर्णपणे भक्तिगीताला आवाज देण्याचा तिचा हा पहिलाच प्रयत्न आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये या गाण्याविषयी कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटसृष्टीतील आणि वैयक्तिक आयुष्यातील एका महत्त्वाच्या टप्प्यावर तिने हा निर्णय घेतला आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये तिने आणि तिचे पती राघव चड्ढा यांनी त्यांच्या पहिल्या अपत्याचे नीर नावाच्या मुलाचे स्वागत केले. या मातृत्वाच्या सुखाचा आनंद घेत घेत ती आता हळूहळू तिच्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांकडे परतत आहे. चित्रपटांच्या व्यग्र वेळापत्रकात लगेच न गुंतता, परिणीतीने सध्या काही वेगळे आणि सर्जनशील प्रयोग करण्याचे ठरवले आहे. नुकतेच तिने 'मॉम टॉक्स विथ परिणीती चोप्रा' हा डिजिटल टॉक शो सुरू केला आहे. यामध्ये ती इतर प्रसिद्ध पालकांशी मुलांचे संगोपन आणि व्यावसायिक जीवन यावर गप्पा मारते.

# 'दोस्ताना २'मधून अद्वैत बाहेर



**फिल्ममेकर** करण जोहरच्या 'धर्मा प्रोडक्शन्स' अंतर्गत निर्माण होणाऱ्या 'दोस्ताना २' या बहुप्रतीक्षित चित्रपटाबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. दिग्दर्शक अद्वैत चंदन यांनी या चित्रपटातून अधिकृतपणे काढता पाय घेतला आहे. चित्रपट निर्मितीदरम्यान झालेल्या रचनात्मक मतभेदांमुळे अद्वैत चंदन यांनी या प्रकल्पातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. 'सिक्रेट सुपरस्टार' आणि 'लाला सिंग चड्ढा' यांसारख्या चित्रपटांचे दिग्दर्शन करणाऱ्या अद्वैत चंदन यांच्याकडे 'दोस्ताना २'च्या दिग्दर्शनाची धुरा सोपवण्यात आली होती.

गेल्या काही महिन्यांपासून ते या चित्रपटाच्या संहितेवर (स्क्रिप्ट) काम करत होते. मात्र, कथेची मांडणी, व्यक्तिरेखांचे स्वरूप आणि चित्रपटाचा मुख्य गाभा यावर दिग्दर्शक अद्वैत चंदन आणि निर्माता करण जोहर यांच्यात एकमत होऊ शकले नाही. दोन्ही बाजूंनी अनेक चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

परंतु शेवटी रचनात्मक स्तरावर तडजोड न करता एकमेकांच्या संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी २०१९ मध्ये कार्तिक आर्यन, जान्हवी कपूर आणि लक्ष्य लालवाणी यांच्या मुख्य भूमिकांसह या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती आणि कॉलिन डी'कुन्हा या चित्रपटाचे दिग्दर्शन करत होते. मात्र, काही कारणांमुळे कार्तिक आर्यन या चित्रपटातून बाहेर पडला आणि संपूर्ण प्रकल्प गुंडाळावा लागला होता.

# सलमान-नयनताराचा मुंबईत थरार





**बॉलिवूडचा** सुपरस्टार सलमान खान आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री नयनतारा यांच्या मुख्य भूमिका असलेल्या आगामी बहुप्रतीक्षित चित्रपटाचे पुढील चित्रीकरण मुंबईत होणार आहे. मनाली येथील चित्रीकरणाचे वेळापत्रक (शेड्यूल) यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर, आता १० जूनपासून मुंबईतील वांद्रे पश्चिम आणि आसपासच्या भागात या चित्रपटाच्या महत्त्वपूर्ण ॲक्शन दृश्यांचे चित्रीकरण सुरू होणार आहे.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक वंशी पैदीपल्ली या चित्रपटाचे दिग्दर्शन करत असून, दिल राजू यांच्या 'श्री व्यंकटेश्वरा क्रिएशन्स' या संस्थेद्वारे या चित्रपटाची निर्मिती केली जात आहे. सलमान आणि नयनतारा ही जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार असल्याने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. चित्रपटातील काही अत्यंत महत्त्वाच्या ॲक्शन दृश्यांसाठी एका मोठ्या आणि गजबजलेल्या शहरी भागाची गरज होती. यासाठी वांद्रे परिसरातील विविध खुल्या आणि सार्वजनिक ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. या चित्रीकरणामध्ये दोन्ही मुख्य कलाकारांचा समावेश असलेले हाय-व्होल्टेज चेस सीक्वेन्स (गाड्यांचा पाठलाग करणारी दृश्ये), वाहनांवर आधारित स्टंट्स, आमनेसामने होणारी फाईट (क्लोज-क्वार्टर कॉम्बॅट) आणि गर्दीच्या ठिकाणची थरारक दृश्ये पाहायला मिळतील.

# हेल्दी Me

# रूट कॅनाल उपचारांनंतर...

**दंतवैद्यकशास्त्रात** गंभीरपणे क्षय झालेल्या दातांना वाचवण्यासाठी 'एंडोडोंटिक' म्हणजेच रूट कॅनाल ही एक अत्यंत प्रभावी उपचार पद्धती मानली जाते. या प्रक्रियेमध्ये दातांच्या मुळांमधील 'डेंटल पल्प' म्हणजेच चेतातंतू आणि रक्तवाहिन्यांचा संक्रमित भाग काढून



टाकला जातो. त्यानंतर रिकामी झालेली पोकळी निर्जंतुक करून ती बायोकंपेटेबल पॉलिमरने सील केली जाते. तथापि, हे उपचार पूर्ण झाल्यानंतरही दीर्घकालीन ओरल हेल्थ टिकवून ठेवण्यासाठी काही प्रगत क्लिनिकल तपासण्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

सीबीसीटी स्कॅन: रूट कॅनाल उपचारांनंतर बाह्यतः दात सुस्थितीत दिसत असले, तरी मुळांच्या अंतर्गत भागात सुप्त संसर्ग असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी 'कोन बीम कॉम्प्युटेड टोमोग्राफी' ही तंत्रज्ञान प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरते. पारंपारिक द्वि-मितीय क्ष-किरणांच्या तुलनेत, सीबीसीटी स्कॅन दातांचे आणि सभोवतालच्या जबड्याच्या हाडांचे त्रिमितीय चित्रण प्रदान करते. या स्कॅनद्वारे 'पेरिॲपिकल लेशन्स' (मुळांच्या टोकापाशी असणारी सूज) किंवा सूक्ष्म भेगांचे निदान करणे सोपे जाते. रूट कॅनालच्या यशाची पुष्टी करण्यासाठी उपचारांनंतर ३ ते ५ वर्षांच्या अंतराने हे स्कॅन करणे क्लिनिकली शिफारसीय आहे.

**सी-रिॲक्टिव्ह प्रोटीन :**



दातांच्या मुळांमध्ये किंवा हिरड्यांमध्ये सुप्त इन्फ्लेमेशन (दाह) आहे की नाही, हे तपासण्यासाठी 'सीआरपी'ही रक्तातील बायोमार्कर चाचणी अत्यंत महत्त्वाची आहे. यकृताद्वारे उत्पादित होणारे हे प्रथिन शरीरातील कोणत्याही भागातील दाहक प्रक्रियेला प्रतिसाद म्हणून वाढते. जर सीआरपीची पातळी कमी असेल, तर ते एंडोडोंटिक प्रक्रियेच्या यशाचे आणि कोणत्याही नवीन संसर्गाच्या अभावाचे निदर्शक असते.

**प्रगत क्लिनिकल देखरेख आणि सावधगिरी**

यशस्वीरित्या पूर्ण झालेले रूट कॅनाल पुढील १० वर्षांहून अधिक काळ कार्यक्षम राहू शकते. जर सीबीसीटी स्कॅनमध्ये मुळांचा भाग पूर्णपणे संसर्गमुक्त दिसत असेल आणि सीआरपी स्तर सामान्य असतील, तर विनाकारण रूट कॅनाल काढून टाकणे किंवा बदलणे टाळावे. अनेकदा रुग्णांना 'ब्रेन फॉग' (स्मृतिभ्रंश सदृश अवस्था) किंवा जुनाट थकवा यांसारखी 'सिस्टेमिक' लक्षणे जाणवतात, ज्याचा संबंध दंत आरोग्याशी असू शकतो. अशावेळी दंतवैद्यकीय निष्कर्षांची सखोल तपासणी करणे आवश्यक असते. कोणत्याही प्रकारच्या 'डेंटल इंप्लांट' प्रमाणेच रूट कॅनाललाही नियमित 'फॉलो-अप' आणि शास्त्रीय देखरेखीची आवश्यकता असते, जेणेकरून संभाव्य गुंतागुंत वेळीच टाळता येईल.

# मुलांनी नेमकी कोणती योगासने करावीत?



**योगासने** हा मुलांसाठी शारीरिक आणि मानसिक विकासाचा एक उत्तम मार्ग आहे. शालेय अभ्यास, खेळांमधील स्पर्धा आणि वाढता स्क्रीन टाईम यामुळे मुलांमध्ये येणारा ताण कमी करण्यासाठी योगासने मोलाची भूमिका बजावतात. नियमित योगाभ्यासामुळे मुलांची रोगप्रतिकारशक्ती वाढते, झोप सुधारते आणि आत्मविश्वास बळावतो. मुलांच्या वाढत्या शरीरातील स्नायूंना लवचिकता देण्यासाठी आणि श्वसन प्रक्रियेवर नियंत्रण मिळवण्यासाठी काही सोपी योगासने अत्यंत प्रभावी ठरतात.

ताडासन हे मुलांच्या योगाभ्यासाची सुरुवात करण्यासाठी सर्वोत्तम आसन आहे. यामध्ये पर्वतासारखे ताठ उभे राहून दोन्ही हात वरच्या दिशेला खेचले जातात. यामुळे मुलांची मुद्रा सुधारते आणि शरीराचा पाया मजबूत होतो.

वृक्षासन हे एकाग्रता वाढवण्यासाठी महत्त्वाचे मानले जाते. एका पायावर शरीराचा तोल सांभाळत वृक्षासारखे स्थिर राहिल्याने मुलांचे संतुलन कौशल्य विकसित होते आणि पायांचे स्नायू बळकट होतात.

मुलांच्या चंचल मनाला शांत करण्यासाठी बालासन हा एक उत्तम उपाय आहे. गुडघ्यावर बसून कपाळ जमिनीला टेकवून विसावा घेतल्याने मज्जासंस्थेला आराम मिळतो आणि दिवसभराचा थकवा दूर होतो.

अधोमुख श्वानासन केल्याने शरीराचा आकार इंग्रजी 'व्ही' अक्षरासारखा होतो, ज्यामुळे हात आणि खांद्यांची ताकद वाढते. हे आसन मुलांमधील समन्वय सुधारण्यासाठी फायदेशीर ठरते.

आजकाल मुले तासन्तास एका जागी बसून अभ्यास करतात किंवा जड दप्तरे वाहतात, ज्यामुळे त्यांच्या पाठीच्या कण्यावर ताण येतो. भुजंगासन या समस्येवर प्रभावी असून, ते पाठीचा कणा मजबूत करते आणि छातीचे स्नायू विस्तारते. या आसनामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढून पचनक्रियाही सुधारते.

कंबर आणि मांड्यांच्या लवचिकतेसाठी बद्ध कोनासन किंवा बटरफ्लाय पोझ अत्यंत उपयुक्त आहे. यामुळे पोटाच्या खालच्या भागातील ताण कमी होतो.



मार्जरासन आणि बिटिलासन म्हणजेच मांजर आणि गाय यांसारख्या हालचालींमुळे पाठीच्या कण्याला चांगला व्यायाम मिळतो, ज्यामुळे मुलांची शरीरयष्टी लवचिक राहते आणि त्यांचा स्वभाव संतुलित राहण्यास मदत होते.




# पीसीओएस नव्हे, पीएमओएस !

*जगभरातील प्रत्येक आठ महिलांपैकी एका महिलेला प्रभावित करणाऱ्या पीसीओएस या आजाराचे नाव आता बदलून पीएमओएस म्हणजेच पॉलीएंडोक्राईन मेटाबॉलिक ओव्हेरियन सिंड्रोम असे करण्यात आले आहे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते हा बदल महिलांच्या आरोग्याकडे अधिक व्यापक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न आहे.*



अनेक वर्षांपासून पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम या नावामुळे हा विकार फक्त अंडाशयांशी संबंधित आहे, असा गैरसमज तयार झाला होता. प्रत्यक्षात हा आजार शरीरातील हार्मोन्स, चयापचय प्रक्रिया, मानसिक आरोग्य, त्वचा आणि प्रजनन व्यवस्थेवर परिणाम करणारा गुंतागुंतीचा विकार आहे. पॉलीसिस्टिक हा शब्द दिशाभूल करणारा होता. कारण या विकारात नेहमीच सिस्ट तयार होतात असे नाही. त्यामुळे अनेक महिलांमध्ये योग्य वेळी निदान होत नव्हते आणि उपचारही अपुरे राहत होते. तब्बल १४ वर्षांच्या संशोधन, चर्चा आणि रुग्णांच्या अनुभवांनंतर या विकाराचे नवीन नाव स्वीकारण्यात आले आहे.

पीएमओएसमध्ये शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बिघडते. विशेषतः अँड्रोजेन नावाच्या पुरुषी हार्मोन्सचे प्रमाण वाढल्याने मासिक पाळी अनियमित होणे, चेहऱ्यावर मुरुम येणे, अवांछित केस वाढणे किंवा केस गळणे अशा समस्या निर्माण होतात. काही महिलांमध्ये वजन झपाट्याने वाढते, तर काहींना मानसिक तणाव, नैराश्य किंवा आत्मविश्वास कमी होण्याचाही सामना करावा लागतो. याशिवाय हा विकार मधुमेह, हृदयविकार आणि पक्षाघाताचा धोका वाढवणाऱ्या चयापचय विकारांशीही संबंधित मानला जातो.

या आजाराचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी अनुवंशिकता, लठ्ठपणा आणि इन्सुलिन हार्मोनमधील बिघाड यांचा त्यात मोठा वाटा असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. शरीरात इन्सुलिनचे प्रमाण वाढल्यास अंडाशयांमध्ये टेस्टोस्टेरॉनचे उत्पादन जास्त होते आणि त्यामुळे अनेक लक्षणे दिसू लागतात. पीएमओएसची लक्षणे प्रत्येक महिलेमध्ये वेगवेगळी असू शकतात. त्यामुळे निदान करणे अनेकदा कठीण ठरते. किशोरवयीन मुलींमध्ये अनियमित मासिक पाळी आणि हार्मोन्सचे वाढलेले प्रमाण ही प्रमुख चिन्हे मानली जातात. काही महिलांना गर्भधारणेत अडचणी निर्माण होतात. कारण नियमित अंडोत्सर्जन होत नाही. त्यामुळे हा विकार महिलांमधील वंध्यत्वाचे प्रमुख कारण मानला जातो.

मात्र योग्य उपचार आणि जीवनशैलीतील बदलांमुळे अनेक महिला यशस्वीपणे मातृत्व अनुभवू शकतात.

# चाळीशीनंतर आई होताना...

*अभिनेत्री दीपिका पादुकोण वयाच्या ४० व्या वर्षी दुसऱ्यांदा आई होणार आहे. तिने २०२४ मध्ये मुलगी दुआला जन्म दिला होता. पूर्वी असे मानले जात असे की, मूल होण्यासाठी २५ ते ३० हे योग्य वय आहे. परंतु आता हे चित्र बदलले आहे. दीपिका पादुकोणसोबतच दिव्यांका त्रिपाठी, सोनम कपूर आणि कतरीना कैफ यांसारख्या अभिनेत्रींनी चाळीशीनंतर नैसर्गिकरित्या आई होऊन हा समज मोडीत काढला आहे. मात्र, या वयात आई होणे खरोखरच सोपे असते का? उशिराच्या गर्भधारणेत (लेट प्रेग्नन्सी) काही धोके असतात का? असे प्रश्न मुलींना पडतात.*

काही प्रकरणांमध्ये चाळीशीनंतरची गर्भधारणा जोखमीची ठरू शकते. वयाच्या ३५ नंतर स्त्रियांची प्रजनन क्षमता (फर्टिलिटी) हळूहळू कमी होत जाते आणि स्त्रीबीजांची गुणवत्ता देखील पूर्वीसारखी राहत नाही. शरीरात आधीच काही आरोग्य समस्या असतील, तर त्याचा परिणाम माता आणि बाळ दोघांवरही होऊ शकतो. वयाच्या या टप्प्यावर गर्भधारणेदरम्यान रक्तदाब वाढणे किंवा गर्भावस्थेतील मधुमेहाचा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. तसेच शारीरिक व्याधींमुळे गर्भपात होण्याचा किंवा बाळ वेळेआधी जन्माला येण्याचा धोका वाढतो.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तिशीपर्यंतच्या वयात शरीर प्रसूतीनंतर जितक्या लवकर पूर्ववत होते, तितक्या वेगाने ते चाळीशीनंतर होत नाही. कंबरदुखी, पाय दुखणे, थकवा आणि अशक्तपणा अशा समस्या दीर्घकाळ जाणवू शकतात.

**अभिनेत्रींना हे कसे शक्य होते?**

सामान्य महिलांच्या तुलनेत अभिनेत्रींचे जीवनशैली नियोजन वेगळे असते. त्यांच्याकडे सकस आहार, नियमित व्यायाम आणि तज्ज्ञ मार्गदर्शकांचा ताफा असतो. प्रसूतीनंतर शरीराला आवश्यक असणारी विश्रांती आणि सोयीसुविधा त्यांच्याकडे उपलब्ध असतात. या शिस्तीमुळेच त्या चाळीशीनंतरही नैसर्गिकरित्या आणि सुरक्षितपणे मातृत्व अनुभवू शकतात.



**सुरक्षित गर्भधारणेसाठी काय करावे?**

उशिरा मातृत्व नियोजित करायचे असेल, तर ते पूर्णपणे डॉक्टरांच्या देखरेखीखाली असावे. हल्ली डॉक्टर गर्भधारणेपूर्वीच सर्व आवश्यक चाचण्या करतात आणि गरज भासल्यास मल्टी-व्हिटॅमिन्स घेण्याचा सल्ला देतात. याखेरीज अशा महिलांच्या आहारात प्रथिने (प्रोटीन), कॅल्शियम आणि लोहयुक्त (आयर्न) पदार्थांचा भरपूर समावेश असावा. नियमित हलका व्यायाम आणि योगासने केल्यास शरीर लवचिक राहते आणि प्रसूतीदरम्यान त्रास कमी होतो. गर्भधारणा नियोजित करण्यापूर्वी एखाद्या चांगल्या स्त्रीरोग तज्ज्ञांशी चर्चा करून शरीराची तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१६३०



**आडवे शब्द –**

१. लाल रंगाचा व त्यावर काळे-राखाडी पट्टे असलेला घोडा ४. वरी, नाचणीसारखी हलकी तृणधान्ये ७. त्रास, उच्छाद ९. प्रघात १२. संपन्न, वैभवशाली १३. चिन्ह, खूण १५. शनिवार १८. टोचणी १९. जननी, आई २१. विपुलता २२. भेग २३. सरावलेला, सवय झालेला २५. हानी २७. अधोगती २९. ढोंग ३०. रात्र ३२. रायआवळा ३४. लाकडी पळी ३६. सूर्याचे किरण ३७. दोस्त, मित्र ३८. झोपाळा, झूला ३९. तोरा, ऐट ४०. तुकडी, पलटण ४१. यंत्रावर काम करणारा ४३. अननुभवी, पोरगेलासा ४४. समानता ४५. भाजी चिरण्याचे साधन ४६. हंस पक्षी ४७. गार, थंड ४८. अही, सर्प ४९. सुतारकामाचे एक आयुध ५०. निर्झर ५१. रामाचा एक भाऊ ५३. गुच्छ, झुबका ५६. आदेश, हुकूम ५७. हिमालयाची कन्या पार्वती ५९. सामूहिक आक्रंदन ६१. कोणाला कळू न देता ६२. साखरेचा प्रकार ६४. व्यवस्थित ६५. फ्लॉवर वर्गातील एक भाजी ६६. लहर ६७. सळईवर भाजलेला खमंग पदार्थ ६९. रामायणातील सुवर्णमृग ७१. अन्याय, जुलूम ७३. अंधाराचा शत्रू, सूर्य ७४. उन्माद ७५. शत्रू ७७. झोपमोड ७९. ग्राहक, खरेदीदार ८०. त्याप्रमाणे ८१. फौंटन पेनचे टोक ८२. जागरूकता, सजगता, दक्षता ८५. उद्दिष्ट ८६. हाडांच्या पोकळीतील द्रव ८८. टेंभा ८९. भीमाचे एक नाव ९१. अशोकवन उद्ध्वस्त करणारा, हनुमान ९३. पलिता ९४. ऱ्हास; फुफ्फुसांचा मोठा आजार ९५. उष्णतेचा त्रास ९७. गारगोटीचा दगड ९९. वस्ती १०२. पूजेसाठी वापरले जाणारे तांब्याचे खोलगट पात्र १०३. पाण्यावर चालणारे जनित्र १०४. नूतन १०४. सौम्य नेमस्त धोरण

**उभे शब्द –**

१. संत ज्ञानेश्वरांची एक रचना २. बांधला गेलेला ३. दुष्ट ४. पायी चालून दमणूक ५. संन्याशाचे जलपात्र ६. सभा, समुदाय ७. वाळवी ८. फुलांची माला १०. विल्हेवाट ११. आप, पाणी १२. भरतीची वेळ १४. नाशवंत, अशाश्वत १६. बोलबच्चन, कृतिशून्य १७. भरडलेले द्विदल धान्य २०. पळून गेलेला २३. विषयाचा आराखडा, सारांश, बाह्यरेषा २४. पातळ गादी, रजई २६. दृष्टी, कटाक्ष २८. बोअरवेल २९. सोटा, बडगा ३१. नावेचा मुख्य ३२. निरोप आणणारा-नेणारा, दूत ३३. अतिशय तापलेले, रसाळ ३५. नम्रता ३६. देवांची घोडागाडी ४०. भाजी वाढून घेण्याचे साधन ४२. ढगांनी सूर्य झाकला जाणे ४३. श्रीकृष्णाचा मोठा भाऊ ४४. विस्तृत, तपशीलवार ४५. ईश्वर, देव ४८. श्रीविष्णू ५०. वेगाने ५२. चिकार ५४. मोठा ५५. लांब चोचीचा पाणपक्षी ५६. स्वतःची मिळकत ५७. उत्साह, आवेश ५८. लठ्ठ व रुंद ६०. राजाचा लेखनिक ६१. फुलांचा राजा ६२. स्तंभ ६३. समाजासाठी झिजणारा ६८. लहानसहान, किरकोळ ७०. जीवनकहाणी ७१. आळंदीचा वृक्ष ७२. टाकून देणे, हक्क सोडणे ७३. पद्धत, रीत ७४. कुरघोडी ७६. विपुल, भरपूर ७८. पाश ७९. पर्वत ८१. रात्र ८२. हाक, हाळी ८३. दैवी देणगी ८४. आरडाओरडा, गलका ८७. पराभव ८८. रम्य, रमणीय ९०. विळा ९२. बदनामी ९३. उसाचा घट्ट रस ९६. शपथ ९८. चित्त १००. लहान, छोटा १०१. फिकीर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२९ चे उत्तर**

**आडवे शब्द** : ३. खचलेला ६. जागल्या ९. टेप ११. छाती ठोकपणे १३. लूटमार १४. मोसंबी १५. हिव १७. रया १८. आच १९. नौबत २०. खलास २१. लेप २३. सचकार २५. सुमारे २७. तूळ २८. लाटणे २९. वखार ३१. लवलाही ३४. बट्टा ३५. चोचले ३६. कचेरी ३७. नाठाळ ४०. किरीट ४१. पिसारा ४४. थाट ४५. आतडे ४७. माकड ४९. शृंखला ५०. आतुर ५१. तावदान ५३. राई ५५. टवळी ५६. गटार ५७. तनया ५९. षष्ठी ६०. वैजयंती ६२. माया ६४. बाका ६५. मखाणा ६७. उणे ६८. फितुरी ६९. चबढब ७०. घंटी ७१. वनश्री ७२. फकीर ७४. टांगा ७५. स्वारस्य ७८. तडा ८०. अज्ञ ८१. गळसरी ८३. उदास ८५. खळे ८६. चवचाल ८९. ऋग्वेद ९०. दारुडा ९२. मगरमिठी ९४. लसणी ९६. याग ९८. खवाटा १००. वात १०१. वितान १०२. मचवा १०३. तळमळ १०४. वेष १०५. दलदल १०६. संतप्त

**उभे शब्द** : १. पछाडलेला २. कठोर ३. खप ४. चणे ५. लालूच ६. जामानिमा ७. गर ८. उसंत १०. पहिला १२. कयास १४. मोबदला १६. वसंत १८. आरव २०. खळबळ २२. पटवारी २४. चमचमीत २५. सुर २६. रेलचेल ३०. खानसामा ३२. वरी ३३. हीना ३८. ठाम ३९. वेटर ४०. किनतान ४२. राकट ४३. पखवाज ४४. थातुरमातूर ४५. आनन ४६. डेरा ४८. डवरणे ५०. आटा ५२. दात काढणे ५४. ईषणा ५६. गती ५८. याम ६०. वैमनस्य ६१. यंत्र ६३. यारी ६४. बाब ६६. खास ६७. उटी ६८. फिकीर ६९. चर्वितचर्वण ७०. घंगाळ ७१. वर ७३. सुज्ञ ७४. टांग ७५. स्वारी ७६. गदा ७७. बळे ७९. डाव ८०. अलग ८२. सफलता ८३. उदयाचल ८४. सदा ८५. खडावा ८७. चामखीळ ८८. अमित ८९. ऋणी ९१. रुखवत ९३. रवाळ ९५. सनद ९७. गवा ९९. टाच १०१. विष १०२. मद

## वैभव नाईक सक्रिय झाले की नोटीस येते! राऊतांचा आरोप

मुंबई

**रत्नागिरी** येथील भ्रष्टाचार विरोधी पथकाने (एसीबी) कणकवली नगरपंचायतीला पत्र पाठवून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उबाठाचे माजी आमदार वैभव नाईक यांनी २००२ आणि २००६ साली खरेदी केलेल्या दुकान गाळ्यांबाबत सविस्तर माहिती मागवली आहे. यावरून उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी असा आरोप केला आहे की, वैभव नाईक सक्रिय झाले की नोटीस येते.

संजय राऊत म्हणाले की, वैभव नाईक यांची चौकशी गेली अनेक वर्षे सुरू आहे. नेमकी ही चौकशी का सुरू आहे? त्या चौकशीला काही दिशा नाही. वैभव नाईक जेव्हा जेव्हा पक्षात आणि मतदारसंघात सक्रिय होतात, लोकांचे प्रश्न मांडायला लागतात, तेव्हा लगेच दुसऱ्या दिवशी त्यांच्या हातामध्ये चौकशीची नोटीस दिली जाते. हा निव्वळ राजकीय सूडबुद्धीचा प्रकार आहे. अशा नोटिसा फक्त विरोधकांनाच का येतात? सत्ताधारी पक्षात धुवून पवित्र झालेल्यांना नोटिसा का जात नाहीत? गृहमंत्री म्हणून फडणवीसांनी या पक्षपाती कारभारात तातडीने लक्ष घातले पाहिजे. माणसे प्रेमाने जिंकता येतात, पैशाने नाही असे विधान देवेंद्र फडणवीस यांनी काल केले होते.

## ४७ दिवसानंतरही आंदोलक ठाम

**सांगली-** सांगलीतील हुतात्मा साखर कारखान्यासमोर सुरू असलेले आंदोलन ४७ व्या दिवशीही सुरू आहे. अध्यक्ष वैभव नायकवडी यांनी कारखान्यावर केलेले कर्ज फेडून राजीनामा द्यावा या मागणीसाठी किरण नायकवडी, गौरव आणि केदार नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली सभासद व शेतकऱ्यांनी हे ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. वैभव नायकवडी यांनी राजीनामा दिला असला तरी तो पूर्णतः कायदेशीर प्रक्रियेनुसार अमलात येईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. संकुलातील संस्थांमधील गैरव्यवहारांचा हिशेबही मांडला गेला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## कामोठ्यात वारंवार वीजखंडित नागरिकांचा रास्तारोको आंदोलन

पनवेल

**नवी** मुंबईतील कामोठे परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या वारंवारच्या वीजखंडिताने संतप्त झालेल्या नागरिकांनी काल रात्री रास्तारोको आंदोलन केले. वीजपुरवठा सुरळीत करण्यास होत असलेल्या विलंबाविरोधात नागरिकांनी महावितरणविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तीव्र नाराजी व्यक्त केली. मध्यरात्री वीजपुरवठा पूर्ववत झाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

कामोठे शहरातील विविध भागांमध्ये गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. काही दिवसांपूर्वी खंडीत झालेला वीजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी तब्बल २७ तास लागले होते. त्यानंतर शुक्रवारी सायंकाळपासून पुन्हा वीजपुरवठ्याचा लपंडाव सुरू झाला. शनिवारी सायंकाळी सुमारे सहा वाजता वीज गेल्यानंतर मध्यरात्रीपर्यंत पुरवठा सुरळीत झाला नव्हता.

सततच्या या समस्येमुळे वैतागलेल्या नागरिकांनी लहान मुलांसह रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले. काही नागरिकांनी महावितरणच्या उपकेंद्र कार्यालयाकडे धाव घेतली, तर दुसरा गट कामोठे पोलीस ठाण्याजवळील मुख्य रस्त्यावर जमा झाला. नागरिकांचा आक्रमक पवित्रा पाहून पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात करत शांतता राखण्याचे आवाहन केले.

## अमरावतीत जनगणना कर्तव्यावर असलेल्या शिक्षकाचा मृत्यू

अमरावती

**अमरावती** जिल्ह्यातील वरूड तालुक्यात जनगणनेच्या कर्तव्यावर असलेल्या शिक्षकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. करजगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक प्रदीप गणोरकर हे जनगणना प्रगणक म्हणून काम करत होते. प्रखर उष्म्यात काम करत असताना त्यांची प्रकृती बिघडून उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

वरूड तालुक्यात सध्या ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास तापमान आहे. गणोरकर यांनी आदल्या दिवशी कर्तव्य बजावले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजताच्या सुमारास ते पुन्हा जनगणनेच्या कामासाठी घराबाहेर पडले. मात्र वाटेत त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने ते परत गावाकडे निघाले. प्रकृती अधिक बिघडल्याने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यात त्यांचा मृत्यू झाला.


### जाहिर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, आमच्या पक्षकारांच्या निर्देशानुसार, आम्ही **श्री. सिद्दिक इब्राहिम खत्री उर्फ श्री. सिद्दिक इब्राहिम खत्री, श्रीमती मैमूना इक्बाल खत्री, श्री. अल्ताफ इक्बाल खत्री, श्री. समीर इक्बाल खत्री आणि श्री. अब्दुल कादर इब्राहिम खत्री उर्फ श्री. अब्दुल कादर इब्राहिम खत्री** (**"मालक"**) यांच्या मालकी हक्कांची तपासणी आणि पडताळणी करत आहोत, हे मालक, खालील **अनुसूचीमध्ये** अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या, भाड्याने दिलेल्या इमारतीसह जमिनीचे (यापुढे एकत्रितपणे "मालमत्ता" म्हणून संबोधले जाईल) मालक असून, ते त्या जमिनीचे पूर्ण हक्कदार आहेत, मालकाने सदर मालमत्ता आमच्या पक्षकाराला कोणत्याही आणि सर्व बोजा व दाव्यांपासून मुक्त, निर्दोष मालकी हक्कासह विकण्यास / हस्तांतरित करण्यास आणि / किंवा सदर मालमत्तेच्या संदर्भात विकासाचे हक्क प्रदान करण्यास सहमती दर्शविली आहे.

सर्व व्यक्ती/संस्था, ज्यामध्ये इतरांबरोबरच कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांचा समावेश आहे, ज्यांना मालमत्तेच्या संदर्भात किंवा सदर मालमत्तेच्या आणि/किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या हक्कपत्रांच्या (ज्यात कोणतेही गहाळ/हरवलेले हक्कपत्र समाविष्ट आहे) संदर्भात, किंवा विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाड्याने देणे, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेकरार, पोट-भाडेकरार, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, बोजा, धारणाधिकार, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देणगी, निर्वाह, सुखाधिकार, विश्वस्त संस्था, ताबा, भोगवटा, काळजीवाहक तत्त्वावर, कौटुंबिक व्यवस्था/समझोता, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/समझौते, विकास हक्क, एफएसआय वापर, भागीदारी, मृत्युपत्र, ताबा किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, मालकी, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा किंवा मागणी असेल, त्यांनी याद्वारे सार्वजनिक सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोस्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला, कागदोपत्री पुराव्यांच्या नोटरीद्वारे प्रमाणित सत्य प्रतींसह, लेखी स्वरूपात याची माहिती देणे आवश्यक आहे. जर कोणताही दावा केला गेला नाही, तर सदर मालमत्ते-मधील अशा कोणत्याही कथित दाव्याचा किंवा हितसंबंधाचा संदर्भ न घेता किंवा तो विचारात न घेता व्यवहार केला जाऊ शकतो, आणि तो सर्व हेतूंसाठी सोडून दिलेला आहे असे मानले जाईल व तो आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

**वर नमूद केलेल्या अनुसूचीनुसार : (मालमत्ता)**

मुंबई शहरातील लॅमिंग्टन रोडच्या पश्चिम बाजूस स्थित असलेली जमिनीचा तो सर्व भाग आणि विभाग, ज्यावर पूर्वी "माधव मॅन्शन" आणि आता "इब्राहिम सिद्दिक मॅन्शन" म्हणून ओळखले जाणारे घर किंवा निवासस्थान आहे, ज्यात तळमजला अधिक ४ मजले असून, दिनांक ९ ऑक्टोबर १९३१ रोजीच्या हस्तांतरण करारनाम्या-नुसार तिचे मोजमाप अंदाजे १००६ २/५ चौरस यार्ड आहे आणि मालमत्ता कार्डनुसार तिचे मोजमाप १००६ २/९ चौरस यार्ड म्हणून नोंदवले आहे. तसेच, तारदेव विभागाचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. २/२६३, लॉटन सर्व्हे क्र. १/७००१ आहे. सदर जागा मुंबई शहराच्या नोंदणी आणि उप-जिल्ह्यात १६६-१७८ डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग (लॅमिंग्टन रोड), मुंबई-४००००७ येथे स्थित आहे.

**दिनांक : ८ जून, २०२६**

**सही/-**
**कु. अझीझा खत्री**
**एएके लीगल**
**ॲडव्होकेट व सॉलिसिटर्स**
सर विठ्ठलदास चेंबर्स,
५०८, ५ वा मजला, १६,
मुंबई समाचार मार्ग, फोर्ट,
मुंबई- ४००००१.
ई-मेल : aziza@aaklegal.in


## किंमत जास्त असल्याने मोदींनी भेट दिलेला हिरा सरकारला परत केला

पान १ वरून

रत्न उद्योगातील प्रगतीचे प्रतीक होता. तो हिरा खूपच सुंदर आणि आकर्षक होता. मला तो खूप आवडला. मात्र अमेरिकेतील नैतिकता आणि सरकारी मालमत्तेशी संबंधित नियमांनुसार, ठरावीक मूल्यापेक्षा जास्त किमतीच्या भेटवस्तू वैयक्तिक मालकी म्हणून ठेवता येत नाहीत. त्या भेटवस्तूंची सरकारी स्तरावर तपासणी आणि मूल्यांकन केले जाते. संबंधित व्यक्तीला इच्छा असल्यास त्या वस्तूचे बाजारमूल्य भरून ती खरेदी करता येते. जिल यांनी म्हटले आहे की, सुरुवातीला त्यांचा हा हिरा विकत घेण्याचा विचार होता. पंतप्रधान मोदी यांनी त्याची किंमत सुमारे २,५०० डॉलर सांगितली होती. मात्र अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने मूल्यांकन केल्यानंतर त्या हिऱ्याची किंमत सुमारे २०,००० डॉलर ठरवली. त्यानंतर त्यांनी तो खरेदी करण्याचा विचार सोडून दिला. त्यानंतर त्यांना हा हिरा



अधिकृत कार्यक्रमांसाठी उसना घेण्याची परवानगी मिळाली. त्यांनी तो अंगठीत बसवून काही कार्यक्रमांमध्ये परिधानही केला. मात्र व्हाईट हाऊसमधील कार्यकाळ संपल्यानंतर नियमांनुसार तो हिरा सरकारकडे परत केला.

## अमेरिकेतील ओहायोमध्ये गोळीबार! १२ जण जखमी

वॉशिंग्टन

**अमेरिकेतील** ओहायो राज्यातील टोलेडो शहरात आयोजित करण्यात आलेल्या स्ट्रीट फेस्टिव्हलदरम्यान गोळीबाराची घटना घडली. या घटनेत १२ जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. टोलेडो पोलिसांच्या माहितीनुसार, सायंकाळी सुमारे ५.३० वाजता ओल्ड वेस्ट एंड फेस्टिव्हल परिसरात गोळीबार झाला. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तेथे अनेक लोक गोळी लागून जखमी झाल्याचे आढळून आले. गोळीबार करणाऱ्या संशयितांविषयी किंवा हल्ल्याच्या संभाव्य कारणांबाबतही पोलिसांनी कोणताही खुलासा केलेला नाही.

## वरळी डोममधील कॉन्सर्टमध्ये तरुणाचा मृत्यू

पान १ वरून-

मृत घोषित केले. याच कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या प्रिया रे या तरुणीचीही प्रकृती अचानक बिघडली. तिला तातडीने जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दोघांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून, उपस्थितांची चौकशी सुरू आहे. या प्रकरणी ८ ते १० जणांची चौकशी करण्यात आली आहे. स्पेसबाऊंड या कंपनीने या कॉन्सर्टचे आयोजन केले होते. पोलिसांनी या कंपनीच्या आयोजकांची चौकशी सुरू केली आहे.

दरम्यान, या कार्यक्रमाला सुरुवातीला पोलिसांनी परवानगी नाकारली होती, मात्र नंतर ती कशी देण्यात आली, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कार्यक्रमात मद्यपानासाठी परवानगी होती का, तसेच इतर नियमांचे पालन झाले होते का, याची तपासणी सुरू आहे. प्राथमिक तपासानुसार, वृषभ गांगुर्डे यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाबाबत प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सध्या राज्यात आणि देशात 'नो टॉलरन्स फॉर ड्रग्स' ही मोहीम राबवली जात आहे. मोठ्या प्रमाणावर गुप्त माहिती (इंटेलिजन्स) गोळा करून त्याच्या आधारे कारवाया केल्या जात आहेत. कोणत्याही परिस्थितीत ड्रगच्या जाळ्याची पाळेमुळे उपटून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, वरळी डोममधील कॉन्सर्टमध्ये मृत्युमुखी पडलेल्या तरुणासंदर्भात पोलीस चौकशी करत आहेत. याप्रकरणी, जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

## कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात ६-७ हजार लोक उपस्थित! दिपकेची कबुली

पान १ वरून

असून लवकरच देशव्यापी आंदोलन उभारले जाणार आहे. त्याची माहिती लवकरच दिली जाईल. अभिजित दीपकेने आज एक्स पोस्ट करून म्हटले की, जंतरमंतर येथे झालेल्या शांततापूर्ण आंदोलनातून सरकारला स्पष्ट संदेश दिला की, आपण एकत्र आलो तर मोठा बदल घडवू शकतो. या आंदोलनात अनेक जण पहिल्यांदाच सहभागी झाले होते, पण एकजुटीमुळे त्यांना शिक्षण व्यवस्थेबाबतची नाराजी व्यक्त करण्याचे धाडस दाखवले. आपण आवाज उठवला नाही तर बदल कधीच होणार नाही. या प्रचंड उन्हातही लहान मुलांपासून विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला, त्याबद्दल मी प्रत्येकाचे मनापासून आभार मानतो. शांततापूर्ण आंदोलन हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे. एकजूट असलेल्या अशा आंदोलनाला सरकार काहीही करू शकत नाही. पण ही सुरुवात आहे, शेवट नाही. धर्मेंद्र प्रधान यांनी संपूर्ण पिढीसोबत अन्याय केला आहे. वाळूज एमआयडीसी पोलिसांच्या माहितीनुसार, दीपके हा आज पहाटे ४.४५ वाजताच्या सुमारास जिजामाता चौक परिसरातील त्यांच्या निवासस्थानी पोहोचला. जवळपास एक वर्षानंतर आई-वडिलांची भेट घेतल्याने कुटुंबियांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले. त्याच्या आई-वडिलांनी औक्षण करून पुष्पहार घालून त्याचे स्वागत केले. कालचे आंदोलन संपल्यावर सुरुवातीला आपण मुंबईला जाणार असल्याचे त्याने जाहीर केले होते. मात्र नंतर सोशल मीडियावरून त्याने छत्रपती संभाजीनगरला घरी जाण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार तो आज पहाटे शहरात आला. अभिजीतने छत्रपती संभाजीनगरला येण्याचे ठरवल्यानंतर पोलीस प्रशासन सतर्क झाले. त्याच्या वाळूज येथील घराबाहेर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून सुमारे ८० पोलीस कर्मचारी आणि १० अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही परिसराला भेट देत सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला होता.

## घरगुती एलपीजी सिलिंडर २९ रुपयांनी महागला

पान १ वरून

आहे. काँग्रेसने म्हटले आहे की, महागाईचा चाबूक पुन्हा एकदा सर्वसामान्यांवर चालवण्यात आला असून, घरगुती गॅस सिलिंडर २९ रुपयांनी महाग करण्यात आला आहे. मोदींची रणनीती स्पष्ट आहे. जनतेकडून पैसे गोळा करा, आपल्या श्रीमंत मित्राची तिजोरी भरा.

ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले की, सातत्याने हे दर वाढवत आहे, या सगळ्या गोष्टीचा परिणाम आज सामान्य माणसाच्या प्रपंचावर होत आहे. प्रधानमंत्र्यांनी सुरुवातीला आम्ही महागाई नियंत्रित ठेवत आहे, असे सांगितले. पण, नियंत्रित याचा अर्थ टप्प्याटप्प्याने हा धक्का द्यायचा हे त्यांचे सूत्र आहे, त्याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी कळेल.

## मान्सूनपूर्व पावसाचा धुमाकूळ

पान १ वरून

लोखंडी अँगल वादळी वाऱ्यामुळे उडून कोसळले. सुदैवाने त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव टोल नाक्यावरील दोन मार्गिका तात्पुरत्या बंद केल्या. परभणी जिल्ह्यातही सोसाट्याच्या वाऱ्याने दाणादाण उडवली. पूर्णा तालुक्यातील पूर्णा झिरो फाटा मार्गावर झाडे रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली. माटेगाव ते लक्ष्मणनगर पाटी मार्गावर चक्रीवादळासारखे तीव्र वारे वाहिल्याने अनेक झाडे उन्मळून पडली आणि हा मार्गही काही काळासाठी बंद ठेवावा लागला.

शिवथर परिसरात वादळी वाऱ्यामुळे विजेचा खांब कोसळून संपूर्ण गावाचा वीजपुरवठा खंडित झाला. अनेक ठिकाणी नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागला. दरम्यान, शेती पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी स्थानिक प्रशासनाने पंचनामे सुरू केले असून, शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत हालचाली सुरू आहेत. नाशिक - मनमाड भागात अवकाळी पावसामुळे शेकडो क्विंटल कांदा भिजल्याने प्रचंड नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त भागांचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी, असे निर्देश राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. अवकाळी पावसामुळे झालेल्या या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांचे आता शासनाच्या मदतीकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, मोसमीच्या प्रगतीचा वेग मंदावल्याने १५ जूनपूर्वी राज्यात सर्वत्र पेरणीयोग्य पावसाची शक्यता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करता हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच शेतीची कामे करावी, असे आवाहन मुख्यमंत्री कार्यालय आणि कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या सरी पडू शकतात. मात्र हा पाऊस पेरणीसाठी पुरेसा ठरणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे. १२ जूनपर्यंत राज्यात उष्णतेची लाट कायम राहणार आहे.




# नवाकाळ



## सौदीतील विद्यार्थ्याला कोरी गुणपत्रिका 'सीबीएसई'विरुद्ध सुप्रीम कोर्टात याचिका

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई)ने परदेशात शिकणाऱ्या इयत्ता १२वीच्या



एका विद्यार्थ्याला कोरी गुणपत्रिका दिल्याचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि वकील विनीत जिंदाल यांनी विद्यार्थ्याच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी सोमवारी सुनावणी होणार आहे.

या विद्यार्थ्याने सौदी अरेबियामधून सीबीएसईची इंटरमिजिएट परीक्षा दिली होती. निकाल जाहीर झाल्यावर त्याला कोरी गुणपत्रिका मिळाली. ॲड. विनीत जिंदाल यांनी सांगितले की, सौदी अरेबियात राहणाऱ्या या मुलाच्या वडिलांनी माझ्याशी संपर्क साधून सांगितले की, सीबीएसईने तेथील अनेक मुलांना निकाल दिलेला नाही, तेव्हा माझा यावर विश्वासच बसला नाही. मी मुलाची गुणपत्रिका पाहिली, तेव्हा मला धक्काच बसला. या विद्यार्थ्याला अंक नसलेली गुणपत्रिका देण्यात आली होती.

बारावीच्या तनिष्क वत्स या आणखी एका विद्यार्थ्यालाही कोरी उत्तरपत्रिका मिळाली. परीक्षा देऊनही त्याला कोरी गुणपत्रिका का देण्यात आली, असे त्याच्या वडिलांनी शाळेला विचारले, तेव्हा त्यांनी त्यांना सीबीएसईकडे पाठवले.




## मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीचा आज निकाल

■ मुंबई

**अखिल** भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. राज्यभरातील १२ मतदान केंद्रांवर शनिवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत ३४०३ मतदारांपैकी १६९८ सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला. सरासरी ४९.९० टक्के मतदानाची नोंद झाली. आता चित्रपटसृष्टीतील सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

यंदाच्या निवडणुकीत विद्यमान सत्ताधारी मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनेल आणि सतीश रणदिवे यांच्या नेतृत्वाखालील चित्रकर्मी पॅनेल यांच्यात मुख्य लढत होत आहे. याशिवाय १६ अपक्ष उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून, त्यापैकी आठ उमेदवारांनी एकत्र येत तिसरी आघाडी निर्माण केली आहे. महामंडळाच्या कार्यकारिणीतील १७ जागांसाठी एकूण ४४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे यंदाची निवडणूक चुरशीची आणि अटीतटीची ठरणार असल्याचे मानले जात आहे. समर्थ पॅनेलकडून गायक गटातील आनंद शिंदे आणि संकलन गटातील विजय खोचीकर हे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. तर चित्रकर्मी पॅनेलकडून अभिनेत्री वर्षा उसगावकर यांचीही बिनविरोध निवड झाली आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर आणि नाशिक जिल्ह्यांतील १२ मतदान केंद्रांवर मतदान झाले. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवरांच्या प्रतिष्ठेची ही निवडणूक मानली जात असल्याने आजच्या निकालाकडे संपूर्ण चित्रपट क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## परळीच्या 'गोपीनाथ' मंदिरात झुरळांना देव मानतात



**बीड -** सध्या सोशल मीडियावर 'कॉकरोच जनता पार्टी' ची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. या निमित्ताने बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे झुरळांशी संबंधित एक अनोखी धार्मिक परंपराही पुन्हा चर्चेत आली आहे. परळीतील वैद्यनाथ मंदिर 'झुरळे गोपीनाथ' मंदिर असून, या मंदिरात झुरळांना पवित्र मानले जाते. या मंदिरात गाभारा, भिंती आणि मूर्ती परिसरात झुरळांचा मुक्त वावर असतो. स्थानिक श्रद्धेनुसार ही झुरळे कोणालाही त्रास देत नाहीत. उलट एखाद्या भाविकाच्या अंगावर झुरळ पडल्यास ते शुभ संकेत मानले जातात. या परंपरेमागे एक आख्यायिका सांगितली जाते. त्यानुसार, भगवान श्रीकृष्णांनी कलियुगात आपल्या सान्निध्यात राहण्यासाठी गोपिकांना झुरळांच्या रूपात पृथ्वीवर वास करण्याचा वर दिला. त्यामुळे या मंदिरातील झुरळांना 'गोपिकांचे स्वरूप' मानले जाते. या मंदिराच्या विशेष खोलीत भरपूर झुरळे आहेत. त्यामुळे या मंदिराला 'झुरळे गोपीनाथ' असे म्हटले जाते.

## वैभव सूर्यवंशीचे आई-वडील आयर्लंड-इंग्लंड दौऱ्यावर जाणार

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ नवी दिल्ली

**अवघ्या** १५ व्या वर्षी भारतीय संघात स्थान मिळवणाऱ्या वैभवच्या आई-वडिलांना आगामी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यावर त्याच्यासोबत जाण्याची परवानगी बीसीसीआयने दिली आहे.

### बीसीसीआयची परवानगी

काल जाहीर करण्यात आलेल्या संघात वैभव सूर्यवंशीची आयर्लंड व इंग्लंड विरुद्धच्या टी-२० मालिकांसाठी तसेच वर्षाअखेरीस होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली. तो भारतीय संघात स्थान मिळवणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिले पाऊल टाकत असताना वैभवचे वडील संजीव सूर्यवंशी आणि आई आरती सूर्यवंशी त्याच्यासोबत परदेश दौऱ्यावर असतील. सर्वोच्च स्तरावरील



क्रिकेटमध्ये पदार्पण करताना कुटुंबाचा आधार मिळावा. या उद्देशाने बीसीसीआयने हा निर्णय घेतला आहे. वैभव सध्या तो भारत 'अ' संघासोबत श्रीलंकेत होणाऱ्या त्रिकोणी मालिकेची तयारी करत आहे.

## भारतीय रस्त्यावर बाईकसवारी ट्रम्पचा एआय व्हिडिओ व्हायरल

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल या समाज माध्यमावर एक एआय-निर्मित व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये ट्रम्प विविध काल्पनिक आणि आकर्षक दृश्यांमध्ये दिसत असून, भारताच्या रस्त्यांवर बाईक चालवतानाचे दृश्य चर्चेचा विषय ठरले आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

सुमारे एक मिनिटाच्या या व्हिडिओमध्ये ट्रम्प कधी वाळवंटात उंटावर स्वार होताना, कधी पॅराग्लायडिंग करताना, तर कधी सिंहावर बसलेले दिसतात. एका दृश्यात ते अंतराळवीराचा पोशाख परिधान करून चंद्रावर अमेरिकेचा ध्वज फडकावत असल्याचेही दाखवण्यात आले आहे. व्हिडिओमध्ये एआयच्या मदतीने ट्रम्प यांचा चेहरा पिझ्झा, बस, जाहिरात फलक, नॉर्दर्न लाईट्स आणि माऊंट रशमोर यांसारख्या विविध पार्श्वभूमीवर दाखवण्यात आला आहे. यात ट्रम्प यांची स्तुती करणारे गाणे ऐकू येते. या गाण्यात एव्हरीबडी लव्हस डोनाल्ड ट्रम्प आणि थँक यू, प्रेसिडेंट ट्रम्प अशा ओळी वारंवार ऐकू येतात. गाण्यामध्ये मेक्सिको, मध्य पूर्व, चीन आणि भारतासह जगातील विविध भागांतील लोक




ट्रम्प यांना पसंत करतात, असा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, एका मिनिटाच्या या व्हिडिओत ट्रम्प या शब्दाचा सुमारे ४५ वेळा, तर डोनाल्ड या नावाचा २९ वेळा उल्लेख करण्यात आला आहे. या व्हिडिओला संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. काही वापरकर्त्यांनी हा व्हिडिओ विनोदी आणि मनोरंजक असल्याचे म्हटले आहे, तर काहींनी तो ट्रम्प यांचा स्वतःची प्रतिमा उंचावण्यासाठी तयार करण्यात आलेला प्रचारात्मक व्हिडिओ असल्याची टीका केली आहे.

## प्रश्न करणाऱ्यांनाही आता परीक्षेची माहिती नसणार

■ नवी दिल्ली

**नीट** पेपरफुटी आणि सीबीएसईच्या गुणांकनातील गोंधळानंतर परीक्षा व्यवस्थेत मोठे बदल करण्याची तयारी सुरू आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) अशी नवी प्रणाली विकसित करत आहे, ज्यात प्रश्न तयार करणाऱ्या तज्ज्ञांनाही ते कोणत्या परीक्षेसाठी प्रश्न बनवत आहेत, हे कळणार नाही.

या योजनेनुसार, विविध विषयांचे तज्ज्ञ स्वतंत्रपणे प्रश्न तयार करतील आणि ते एका डिजिटल बँकेत साठवले जातील. या बँकेत सुमारे १० हजार प्रश्न असतील. नंतर तंत्रज्ञानाच्या मदतीने अंतिम प्रश्नपत्रिका तयार केली जाईल.

### एनटीएची नवी पद्धत

एनटीएच्या अधिकाऱ्यांच्या मते, प्रश्नपत्रिकेची माहिती अतिशय कमी लोकांपर्यंत मर्यादित ठेवण्यावर भर आहे. तसेच भाषांतर प्रक्रियेत बदल करून सुमारे ८५ टक्के काम कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) द्वारे केले जाईल, तर तज्ज्ञ फक्त पडताळणी करतील.

## अमेरिकेत पिझ्झा डिलिव्हरी करणाऱ्या भारतीय तरुणाची गोळ्या झाडून हत्या

■ फिलाडेल्फिया



**अमेरिकेतील** पेनसिल्व्हेनिया राज्यातील फिलाडेल्फिया शहरात पिझ्झा डिलिव्हरी करत असताना भारतीय वंशाच्या अंशुल कुंचा (२८) या तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. तेलंगणातील अंशुलचा या हल्ल्यात जागीच मृत्यू झाला.

अंशुल कुंचा हा मूळचा तेलंगणातील मेडचल-मलकाजगिरी जिल्ह्यातील गुंडलपोचमपल्ली येथील रहिवासी होता. २०२३ मध्ये बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी तो अमेरिकेत गेला होता. शिक्षणासोबतच तो एका बहुराष्ट्रीय कंपनीत काम करत होता आणि अधिक उत्पन्नासाठी अर्धवेळ पिझ्झा डिलिव्हरीचे कामही करत होता. घटनेच्या दिवशी मध्यरात्रीनंतर अंशुलला एका निर्जन भागात पिझ्झा पोहोचवण्याची ऑर्डर मिळाली होती. तो घटनास्थळी पोहोचताच दोन अज्ञात व्यक्तींनी त्याच्यावर जवळून गोळीबार केला. त्याच्या डोक्यात अनेक गोळ्या झाडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले. या प्रकरणात अंशुलकडील कोणतीही वस्तू चोरीला गेली नाही. त्यामुळे ही केवळ लुटीची घटना नसून पूर्वनियोजित हल्ला असण्याचा संशय व्यक्त होत आहे.

## अंधेरी क्रीडा संकुल हॉटेलला दिले सोमय्या यांचा पेडणेकरांवर आरोप

■ मुंबई

**अंधेरी** क्रीडा संकुलातील खेळाडूंसाठी असलेल्या वसतिगृहाच्या वापराबाबत भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावर आज आरोप केले. अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील ५४ खोल्यांचे क्रीडापटू वसतिगृह पाच वर्षांसाठी टर्टल हॉटेलला दिल्याचा दावा सोमय्या यांनी एक्स पोस्टद्वारे करत या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली. किरीट सोमय्या यांनी एक्सवर लिहिले की, मार्च २०२२ मध्ये महापौरपदाचा कार्यकाळ संपण्यापूर्वी किशोरी पेडणेकर यांनी 'द बीएमसी ट्रस्ट' च्या अध्यक्ष या नात्याने हा निर्णय घेतला. खेळाडूंसाठी राखीव असलेल्या वसतिगृहाचा व्यावसायिक वापरासाठी गैरवापर केला. अंधेरी क्रीडा संकुलातील ५४ खोल्या टर्टल हॉटेलला पाच वर्षांच्या कालावधीसाठी दिल्याने खेळाडूंच्या सुविधांवर परिणाम झाला. या निर्णयामागील प्रक्रिया, कराराच्या अटी आणि त्यातून कोणाला लाभ झाला याची सखोल चौकशी व्हावी.

## मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोने तस्करी करणाऱ्या भाजपाच्या पदाधिकाऱ्याला अटक

■ मुंबई

**मुंबई** आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) राबविलेल्या तस्करीविरोधी मोहिमेत मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला. काल मध्यरात्री अडीचच्या सुमारास करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे पाच कोटी रुपयांहून अधिक किमतीचे सोने आणि इतर संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी तपास यंत्रणांनी अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघटनेचे चिटणीस अजित आचेरकर यांच्यासह रोहित कुमार सिंग, संतोष सुभाष, समीमुल्ला शहा, हमीद लेबेरीफ खान आणि फलिल मोहम्मद कासिम यांना ताब्यात घेत अटक केली आहे.

अजित आचेरकर यांनी काही महिन्यांपूर्वी भाजपात प्रवेश केला होता. महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात त्यांचा पक्षप्रवेश झाला होता. त्यानंतर त्यांच्यावर कामगार संघटनेची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. आचेरकर हे रवींद्र चव्हाण आणि अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुहास माटे यांच्या नेतृत्वाखालील युनियनमध्ये कार्यरत असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपावर जोरदार टीका केली आहे. संजय राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना आरोप केला की, मुंबई विमानतळावर अनेक वर्षे शिवसेनाप्रणीत भारतीय कामगार सेना कार्यरत असताना भाजपाने दबाव आणि दादागिरीच्या जोरावर स्वतःची युनियन स्थापन करण्याचा प्रयत्न केला.

## बुलडाणा बनावट हत्याकांड दोन पोलीस निरीक्षक निलंबित

■ बुलडाणा

**राज्यभर** चर्चेत आलेल्या शिवानी कळमेकर बनावट हत्याकांड प्रकरणात दोन पोलीस निरीक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर आणि जळगाव जामोद पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांना निलंबित करण्यात आले असून, या कारवाईमुळे पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.

शिवानी कळमेकरच्या कथित हत्येप्रकरणी बुलडाणा पोलिसांनी मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर जिल्ह्यातील खडकी येथील आदिवासी समाजातील मुलीचे वडील बापूराम कळमेकर आणि भाऊ अजय कळमेकर यांना अटक केली होती. या पिता-पुत्रांना तब्बल २२ दिवस कारागृहात ठेवण्यात आले होते. शिवानी कळमेकर स्वतः बुलडाणा पोलिसांसमोर जिवंत हजर झाल्यानंतर संपूर्ण प्रकरणाला धक्कादायक कलाटणी मिळाली. त्यानंतर न्यायालयाने कळमेकर पिता-पुत्रांची निर्दोष मुक्तता केली होती. जेलमधून सुटका झाल्यानंतर सुरुवातीला कळमेकर पिता-पुत्रांनी पोलिसांनी कोणताही त्रास दिला नसल्याचे सांगितले होते. आता एका व्हिडिओमध्ये त्यांनी गंभीर आरोप केले आहेत.

## दाक्षिणात्य अभिनेत्याने अलिबागमध्ये २४ कोटींची जमीन खरेदी केली

■ अलिबाग

**दाक्षिणात्य** चित्रपटसृष्टीतील अभिनेता आणि 'केजीएफ' चित्रपटामुळे देशभर लोकप्रिय झालेला नवीनकुमार गौडा उर्फ यशने रायगड जिल्ह्यातील अलिबागमध्ये कोट्यवधी रुपयांची जमीन खरेदी केली. अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या या प्रॉपर्टीसाठी यश आणि त्याची पत्नी राधिका पंडित यांनी तब्बल २४ कोटी रुपये मोजल्याची माहिती आहे.



रिअल इस्टेट कन्सल्टन्सी संस्थेला उपलब्ध झालेल्या नोंदणी कागदपत्रांनुसार, यश आणि राधिका पंडित यांनी संयुक्तपणे रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील कामठ गावातील शेतजमिनीचे दोन भूखंड खरेदी केले आहेत. या व्यवहाराची नोंदणी १८ मे रोजी अलिबाग उपनिबंधक कार्यालयात झाली. ही मालमत्ता किहीम बीचलगत असलेल्या किनारी भागात असून, तिचे क्षेत्रफळ सुमारे १.३ एकर आहे. या जागेच्या एका बाजूला गावातील रस्ता तर दुसऱ्या बाजूला समुद्र आहे. जमीन खरेदीसाठी यश आणि राधिकाने १.४४ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क, ६० हजार रुपयांचे नोंदणी शुल्क आणि इतर दस्तऐवजीकरण शुल्क भरल्याचे कागदपत्रांत नमूद आहे.

## पुण्यातील रेव्ह पार्टीवर छापा ८५ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ पुणे

**पुणे** शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने आळंदी-मरकळ रस्त्यावरील एका खासगी रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या कथित रेव्ह पार्टीवर धाड टाकत मोठी कारवाई केली. प्रोजेक्ट एक्स या नावाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर तरुण-तरुणी सहभागी झाले होते. प्रमुख आयोजकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एका आयोजकाला अटक केली आहे.

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील या रिसॉर्टमध्ये रेव्ह पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. पोलिसांनी छापा टाकला तेव्हा तेथे १०७ पुरुष आणि ४९ महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमात अल्पवयीनही सहभागी होते असे म्हटले जाते. कारवाईदरम्यान पोलिसांनी संशयित अमली पदार्थ, प्रतिबंधित हुक्का फ्लेवर, तीन कप-पॉट्स, सुमारे तीन ग्रॅम गांजा जप्त केला. याशिवाय मोठ्या आवाजात संगीत वाजवण्यासाठी वापरण्यात येणारी साऊंड सिस्टीम व विनापरवाना मद्यविक्री होत असल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला आहे. कार्यक्रमासाठी घेण्यात आलेला मद्य परवाना ६ जून रोजी पहाटे साडेतीन वाजेपर्यंतच वैध होता.

## उत्तराखंडातील चारधाम यात्रेत ४७ दिवसांत १५२ भाविकांचा मृत्यू

**उत्तराखंडमधील चारधाम यात्रेच्या पहिल्या ४७ दिवसांत आतापर्यंत तब्बल १५२ भाविकांचा मृत्यू झाला आहे. १९ एप्रिल रोजी यात्रेला सुरुवात झाल्यापासून ४ जूनपर्यंतची ही नोंद असून, हृदयविकाराचा झटका हे मृत्यूमागील प्रमुख कारण असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे.**

■ डेहराडून

**राज्य** आपत्कालीन संचालन केंद्राच्या माहितीनुसार, मृत्यू झालेल्या भाविकांमध्ये आरोग्यविषयक आपत्कालीन घटना तसेच अपघातांमुळे मृत्युमुखी पडलेल्यांचा समावेश आहे. बहुतांश मृत व्यक्तींना पूर्वीपासून काही ना काही गंभीर आजार होते. यात्रेदरम्यान मृत्यू झालेल्यांमध्ये वृद्ध भाविकांचे प्रमाण अधिक असल्याचेही स्पष्ट झाले आहे. चारधाम यात्रेतील चार प्रमुख मार्गांपैकी केदारनाथ मार्गावर सर्वाधिक ७४ मृत्यूंची नोंद झाली आहे. त्याखालोखाल बद्रीनाथ मार्गावर ४४, यमुनोत्री मार्गावर १९ आणि गंगोत्री मार्गावर १५ भाविकांचा मृत्यू झाला आहे.

यंदाच्या यात्रेत आतापर्यंत सुमारे ३० लाख भाविकांनी सहभाग घेतला आहे. ४ जूनपर्यंत २९ लाख ९२ हजार २७२



भाविकांनी चारधामांचे दर्शन घेतले. यामध्ये केदारनाथ येथे सर्वाधिक १० लाख ८८ हजार ४१ भाविकांनी भेट दिली, तर बद्रीनाथ येथे ८ लाख ८८ हजार ३७९ भाविकांनी दर्शन घेतले. गंगोत्री आणि यमुनोत्री येथे तुलनेने कमी गर्दी नोंदवली गेली.

## सोन्यात ३,५०० रुपयांची घसरण चांदी दहा हजारांनी स्वस्त झाली

■ मुंबई

**सोने** आणि चांदीच्या किमतींमध्ये मोठी घसरण नोंदवण्यात आली असून, सराफा बाजारात खरेदीदारांना दिलासा मिळाला आहे. सोन्याच्या दरात सुमारे ३,५०० रुपयांची, तर चांदीच्या दरात १०,००० रुपयांची घसरण झाली आहे. सध्या जीएसटीसह २४ कॅरेट सोन्याचा एक तोळा सुमारे १ लाख ५६ हजार रुपयांवर असून, एक किलो चांदीचा दर २ लाख ५८ हजार रुपये आहे. काही दिवसांपूर्वी सोन्याच्या किमती १ लाख ८० हजार रुपये प्रति तोळा या उच्चांकावर पोहोचल्या होत्या. त्या तुलनेत सध्याचे दर कमी असल्याने सोने खरेदीसाठी ही चांगली संधी असल्याचे व्यापाऱ्यांचे मत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर नागरिकांमध्ये जुने सोने मोडून नव्याने खरेदी करण्याचा कल वाढल्याचेही त्यांनी सांगितले.

## काँग्रेसमधून हकालपट्टीनंतर साहेबराव कांबळे शिंदे गटात

■ यवतमाळ

**यवतमाळ** विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे अधिकृत उमेदवार असलेल्या साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर त्यांची काँग्रेसने हकालपट्टी केली होती. आज साहेबराव कांबळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नंदनवन येथे शिंदे गटात अधिकृत प्रवेश केला. त्यांच्यासोबत शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

या पक्षप्रवेश सोहळ्यास मंत्री संजय राठोड यांचीही उपस्थिती होती. साहेबराव कांबळे यांच्या प्रवेशामुळे यवतमाळ जिल्ह्यातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, विधान परिषद निवडणुकीतील काँग्रेसचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी



आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांच्या येण्यामुळे या भागात संजय राठोड यांची ताकद आणखी वाढेल. वीटभट्टीवर काम करणाऱ्या महिला आणि कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी साहेबराव कांबळे प्रभावीपणे काम करतील. त्यांनी उमेदवारी मागे घेऊन शिवसेनेसोबत काम करण्याचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा आहे.